# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २८/०६/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २८/०६/२००५ रोजी सभा सुचना क्र. ०७ दि. २४/०६/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ९) | श्री. मिलन गोविंद पाटील | सदस्य |
| १०) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ११) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| १२) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १३) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १४) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |

**<u>गैरहजर असलेले सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |

**<u>रजेचा अर्ज आलेले सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांचे हार्दिक स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यापुर्वी मागच्या मा. महासभेत स्थायी समितीच्या दोन सदस्यांची निवड कण्यांत आली. त्यापैकी श्री. रोहिदास पाटील ह्यांचा रजेचा अर्ज आलेला आहे. ते आजच्या सभेला उपस्थित नाहीत. पण श्रीम. अनिता पाटील ह्या उपस्थित असून त्यांचे स्थायी समिती सदस्यांच्या वतीने हार्दिक स्वागत करण्यांत येत आहे.

(मा. सभापती सो. ह्यांनी श्रीम. अनिता पाटील ह्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.)

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, सभेला सुरुवात करण्या अगोदर आपणांला मागच्या ठरावाच्या बाबत विचारणा करावीशी वाटते. खाली तळ मजल्यावर जे उपहारगृह चालविले जाते त्या संदर्भामध्ये मागच्या स्थायी समितीमध्ये ठराव झाला. त्या ठरावाचे इम्प्लिमेन्टेशन अजुनपर्यंत न होण्याचे कारण काय?

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, मागच्या वेळेस स्थायी समितीमध्ये आपण सांगितले होते की, १३ नंबरच्या शाळेमध्ये, येथून सभा चालू असतांना आपण अधिकारी पाठवले. त्या ठिकाणाची परिस्थिती पाहून साफसफाई करायला सांगितले. परंतु, आपण तिथे जाऊन बघा, तिथे आज काय परिस्थिती आहे?

सभा संपल्यानंतर आपली पॅन्ट वर न चढवता त्या शाळेच्या गेटपासून शाळेमध्ये जायचे. काय परिस्थिती आहे ते बघा. एकाही मुलाला चालता येत नाही. तिथे आज काय परिस्थिती आहे ते आपण बघा. तिथे पाणी भरलेले आहे. चार चार इंच पाय आतमध्ये जातो.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, अधिकारी कोण ऐकत नाही. त्याच्यावर तुम्ही कंन्ट्रोल ठेवा.

**हॅरल बोर्जीस :-**

साहेब, आपण रुलिंग दिली आणि रुलिंग देऊन आज पंधरा दिवस झाले. शाळेसारखा शिक्षणाचा महत्वाचा प्रश्न आहे आणि कोणाला काहीच पडले नाही. सभापती साहेब, आपण संभा संपली की, आमच्या सोबत चला व त्या अधिकाऱ्याला पहिले पाठवा व त्याच्या मागून आपण जाऊ.

**गजानन भोईर :-**

चप्पल, बुट पायातून काढायचे नाही. तसेच चालत जायचे.

**प्रभात पाटील :-**

कुत्र्यासारखे खायला घालताहेत. गेली अडीच वर्षे आम्ही मा. महासभेत जेवत आहोत. त्याचे इम्प्लिमेन्टेशन होत नाही. लोकांचे, विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे तुम्हांला काही पडले नाही. मग ठराव करायचे कशाला?

**मिलन पाटील :-**

शिक्षण अधिकाऱ्याला सभेत बोलावून घ्या.

**गजानन भोईर :-**

नवघरच्या येथील मुलांचे आई-वडिल आले. ते आम्हांला सांगतात की, आपण म्हणता आमच्या मुलांना ह्या शाळेत टाका. तर काय बघून मुलांना ह्या शाळेत प्रवेश द्यायला सांगायचे? दोन दिवस झाले मुले शाळेत गेली नाहीत.

**मिलन पाटील :-**

रणखांब साहेब, आपण शिक्षण अधिकाऱ्याला सभेत बोलावून घ्या.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, येथे ठराव करायचेच कशाला, जर त्याचे इम्प्लिमेन्टेशन होत नसेल तर? आपण ही सभा कशाला चालवायची? आता हा जो नाश्ता आला आहे तो खाली कॅन्टीनमध्ये बनलेला आहे का?

**प्र. सचिव :-**

बाहेरुन मागवला आहे. कॅन्टीन बंद आहे.

**प्रभात पाटील :-**

हा नाश्ता बाहेरचा आहे, तर बाहेरुन किती रुपयाने आणता आणि तुमच्याकडून किती रुपये घेतात? ही महानगरपालिका कोणा क्ष व्यक्तीला पोसायला बसली आहे का? तसे असेल तर महानगरपालिकेने आम्हांला सांगावे की, आम्ही त्याला पोसायला घेतले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

ठरावाचे इम्प्लिमेन्टेशन न होण्यामागे कोणाचा पर्सनल इंटरेस्ट आहे?

**प्र. सचिव :-**

सामान्य प्रशासनाकडून माझ्याकडे ठराव आलेला नाही?

**प्रभात पाटील :-**

ठराव का आलेला नाही? सचिव हे तुमचे काम आहे, तो ठराव का आला नाही ते बघण्याचे.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव साहेब, सभेत झालेला ठराव सर्टिफाय करुन तुम्ही त्वरीत प्रत्यक्षात त्या खात्याजवळ पाठवता.

**प्र. सचिव :-**

सभागृहात झालेला तोच ठराव माझ्याकडे दिला. मग मी ताबडतोब देतो. आमच्याकडे कोणताही ठराव पेन्डींग राहतच नाही.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, शिक्षण अधिकाऱ्याला बोलावण्यांत यावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मला पल्स पोलिओबाबत देखील विचारणा करायची आहे.

**प्रभात पाटील :-**

एक-एक प्रश्नाचे उत्तर येऊ द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

ठिक आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, कॅन्टीन चालू आहे की, बंद आहे? कॅन्टीनबाबत मागच्या सभेत ठराव केला. त्याच्या इम्प्लिमेन्टकरिता आपण स्वतः रुलिंग दिलेले आहे. त्याबाबत सचिव साहेब बोलतात की, माझ्यापर्यंत ठराव आला नाही. पण तो ठराव मागण्याचा अधिकार तुमचाच आहे. ते तुम्ही मागवून घ्यायला पाहिजे.

**प्र. सचिव :-**

आम्ही मागितले होते. पण त्यांनी ते दिले नाही.

**रिटा शाह :-**

दिले नाही, म्हणजे त्याच्यावर तुम्ही काय कार्यवाही केली? तुम्ही कमिशनर साहेबांना याबाबत पत्रव्यवहार केला का? त्यांच्याकडे रिमार्क्स पाठवले का? तसेच, आम्हांला जे पाणी प्यायला देता, ते आपण स्वतःने बघितले तर पाणी पिणार नाही. डायरेक्ट नळामधून पाणी भरुन देतात.

**केशव घरत :-**

साहेब, बाटल्या धुतल्यासुद्धा जात नाही. त्या तशाच भरुन आणतात.

**सुर्यकांत भोईर :-**

ह्या बाटल्या बाथरुममध्ये टाकून देतात व बाथरुममध्ये जाणारे हे त्या बाटल्यावरुन जातात.

**रिटा शाह :-**

आणि त्याच बाटल्या उचलून भरुन आणतात. हे आम्ही स्वतः डोळ्याने बघितले आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

पुढच्या सभेपासून आम्हांला बिसलेरी पाण्याची बॉटल देण्यांत यावी.

**रिटा शाह :-**

हवे असल्यास त्याचे पैसे आम्ही स्वतः देवू. पण येथे पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या पॅकमध्ये आणायच्या आणि जेवायचे जे स्टॅंडर्ड आहे ते आपण स्वतः बघता. आपण कसे बिल पेमेन्ट करता?

**प्रभात पाटील :-**

आतासुद्धा नाश्ता मागवला आहे. हा वडा बाहेर दोन रुपये असेल. आपण तीन रुपये त्यांना म्हणजे आपण त्यांना पोसायला घेतले आहे. कशासाठी आणि का? काय लागले आहे त्यांना एवढे सोनं! स्थायी समितीला जे अधिकार आहेत, स्थायी समितीपेक्षा जर एखाद्या व्यक्तीचे अधिकार मोठे असतील, तर तो विषय येथे आणायचाच नाही. कशाला स्थायी समितीला बदनाम करता? एवढा मोठा निर्णय घेऊनसुद्धा त्याची अंमलबजावणी बरोबर होत नाही. तर एखाद्या माणसालाच करायला द्यायचे. एक व्यक्ती जर स्थायी समितीपेक्षा मोठी होत असेल, तर ह्या महानगरपालिकेमध्ये स्थायी समिती चालवयायची कशाला? बंद करा ना!

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, मी तुम्हांला प्रत्येक वेळी सांगतो, मागच्या वेळीही सांगितले की, ठरावाची अंमलबजावणी झाली असा हा विषय घ्या. मी दोन-तीन सभेपासून पोटतिडकीने बोंब मारत आहे की, ठरावाच्या अंमलबजावणीकरिता हा विषय घ्या. कारण हे अधिकारी ठरावाची अंमलबजावणी करत नाहीत. आपण नुसते ठराव करायचे, बासनात बांधून ठेवून देतात. ठरावाची अंमलबजावणी होते, नाही होते हे काही कळत नाही. आपण नाहक असा पैसा महानगरपालिकेचा खर्च करत आहोत आणि अधिकारी हे नुसते ए.सी.मध्ये बसतात. त्यांना ने-आण करायला गाडी असते. आपल्या महानगरपालिकेचे काही कामच होत नाही.

**प्रभात पाटील :-**

आम्हांला जर महापालिकेत यायचे तर सोळा रुपये खर्च होतात.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेब, स्थायी समितीमध्ये आपण वेगवेगळे विषय घेतो आणि ते विषय घेतल्यानंतर त्याच्यावर आम्ही रुलिंग देतो आणि त्या रुलिंगप्रमाणे इम्प्लिमेन्टेशन होणे अत्यावश्यक बाब आहे. त्या संदर्भामध्ये बरीचशी रुलिंग आपण दिलेली होती. मागच्या स्थायी समितीच्या सभेसमोर जेव्हा सन्मा. सदस्य गजानन भोईरजी व सन्मा. सदस्या प्रभात पाटीलजी ह्यांनी नवघर शाळेविषयी जो विषय काढला आणि त्यावेळी पाऊस हा नुकताच सुरु झाला होता. त्या पावसामुळे त्या ठिकाणी चिखल होऊन पाणी जमा होऊन विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकानां आणि शिक्षकांना जाणे-येणे मुश्किल झाले होते. अशा पद्धतीने सन्मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे नवघर शाळेला जाऊन आलो व तिथे गेल्यावर बांधकाम

विभागाचे आणि प्रामुख्याने आरोग्य विभागाचे अधिकारी तिथे होते. त्यावेळी त्यांना सांगण्यांत आले की, अशा पद्धतीने पाणी बाहेर काढून घ्या व आज येथे सभेसमोर शिक्षण विभागाचे अधिकारी येथे उपस्थित पाहिजे हे मी मान्य करतो. परंतु, जेव्हा पाणी काढण्याची बांधकामाची जबाबदारी आहे, त्या तिथे आपण रस्ते केले पाहिजे किंवा भराव केला पाहिजे. ह्या दोन्ही खात्यांकडून जर बेजबाबदार आपण वागलो तर त्याला जबाबदार कोण? सन्मा. सदस्यांच्या अजुन विषयावर मी नंतर बोलतो. परंतु, हा विषय अत्यावश्यक बाबींचा विषय असतांना, रुलिंग देऊन आपण काय केले? आरोग्य विभागामार्फत शहरातले पाणी काढतो व शहरात जिथे जिथे पाणी जमते, तिथे भराव करतो, बांधकाम विभागातर्फे आणि आज जर शाळेतील मुले तिथे जातात. आम्ही आज येथे शैक्षणिक दर्जा वाढला पाहिजे म्हणून माध्यमिक क्षेत्र सुरु केले पाहिजे अशी आमची धारणा आहे. ही आमची भावना व आम्ही तो विषय पुढे आणु इच्छितो. जर आम्ही त्यांना प्राथमिक शाळांमध्ये सुविधा देऊ शकलो नाही, तर त्याला जबाबदार कोण? उपायुक्त साहेब, आम्हांला याबाबत प्रशासनाकडून उत्तर पाहिजे. आम्ही जाब विचारणार नाही. आपण या ठिकाणी जाब विचारुन आम्हांला उत्तर दिले पाहिजे आणि कोणती कार्यवाही करावी व केली पाहिजे, या पद्धतीचे मला आपल्याकडून उत्तर हवे आहे. त्याच्यानंतर पुढच्या सभेला सुरुवात करु.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, सर्व उपस्थित सदस्यांच्या वतीने बरेचसे चिंतन आणि मंथन झालेले आहे. तुम्ही स्वतः तिथे व्हिझीट केली व तुमचे ऑफिशियल रुलिंग तिथे आलेले आहे. आपण स्वतः तिथे गेलेले आहात. उपआयुक्त साहेब तिथे गेले होते. ज्या अधिका-यांनी ही कार्यवाही केली नाही त्यांच्यावर नियमाप्रमाणे जी कार्यवाही असेल ती करा असा मी ठराव मांडतो.

**प्रभात पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने अनुमोदन आहे. साहेब, शिक्षण विभागाचा हा अकार्यक्षम अधिकारी आहे. आपण ह्या अधिका-याची पहिल्यांदा बदली करा. आपल्याकडे असा अधिकारी नको. कारण हा आपल्या शाळा तपासायला नाही, हा प्रायव्हेट शाळा तपासायला आहे. आता आम्ही जो ठराव केलेला आहे त्याची अंमलबजावणी ही झालीच पाहिजे. या अधिका-याला परत पाठविण्याचा तुम्ही बंदोबस्त करा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी आपला विषय असा आहे की, शैक्षणिक विभाग हा आपला आहे, ते बरोबर आहे. परंतू, जेव्हा प्रत्यक्ष जागेवर जाऊन तिथे जमलेले पाणी काढण्या संदर्भामध्ये दोन्ही खात्यांना आपण निर्देश दिले होते आणि त्या निर्देशामध्ये काय कार्यवाही झाली, ह्याचा खुलासा उपायुक्त साहेब आपण प्रशासनामार्फत करावा.

**गजानन भोईर :-**

हे शिक्षण विभागाचे कर्तव्य नाही का? पावसामध्ये विद्यार्थी शाळेमध्ये कसे जातात, कसे येतात ते बघण्याचे त्यांचे कर्तव्य नाही का?

**प्रभात पाटील :-**

बांधकाम विभागाला मला सुचना करायची आहे, नवघरच्या नविन तलावाची भिंत पडलेली आहे.

**गजानन भोईर :-**

ती भिंत पडून चार दिवस झाले.

**प्रभात पाटील :-**

चार दिवस नाही, बरेच दिवस झाले, ती भिंत पडून. तसेच, श्री. कुदरे व श्री. नानेगावकर हे स्वतः माझ्यासोबत व्हिजीटला आले. त्या शाळेच्या भोवती ट्रॅक बांधून घ्या. त्या शाळेला पाऊण तास व्हिजीट केली. हा ट्रॅक चालण्याकरिता महिलांना उपयोगी पडेल. मॉर्निंग वॉकला आणि विद्यार्थ्यांना शाळेत जायलाही उपयोगी आहे. ह्या गोष्टीला दोन महिने झाले. आतापर्यंत तो ट्रॅक बांधून झाला असता.

**गजानन भोईर :-**

नवघर तेरा नंबर शाळेचे विद्यार्थी पंधरा दिवसात किती कमी होतात ते बघा. दहा दिवस अगोदर पटावर किती मुले होती आणि आज हजेरी पटावर किती मुले आहेत त्याचे तुम्ही गणित काढा. परिस्थिती बघा काय आहे ते? काही मुले चार-चार दिवस शाळेत गेले नाही. परिस्थिती बघाल तर तुम्ही सर्वजण हसाल. आपण या महानगरपालिकेच्या शाळेमध्ये आलो की, कुठे आलो आहोत? त्याच्यापेक्षा प्रायव्हेट शाळा चांगल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रायव्हेट शाळेत मुलांना सुविधा दिलेली आहे.

**गजानन भोईर :-**

येथे संडास-बाथरुमचा ठिकाणा नाही. बाथरुम भरलेले आहे. त्या पाण्यातून मुले जातात.

**मिलन पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपण ह्याच्यावर काहीतरी रुलिंग द्या. सभापती साहेबांनी रुलिंग दिलेली आहे, त्याच्यावर आपण कार्यवाही करणार का नाही? ते आपण आम्हांला सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

जे अधिकारी कामात हलगर्जीपणा करतात त्यांच्यावर तुम्ही सस्पेन्डची नोटीस लावा. एखाद्या अधिकाऱ्याला जोपर्यंत सस्पेंन्ड करत नाही तोपर्यंत हे अधिकारी वठणीवर येणार नाहीत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सभापती साहेब, आपल्याला विनंती आहे की, मागच्या सभेमध्ये मी हजर नव्हतो व त्या सभेमध्ये निश्चितपणे काय झाले ह्याची माहिती मिळाली तर त्याप्रमाणे आढावा घेता येईल. कारण त्याच्यावर मी जर काही कमेन्टस् केले तर ते गैर ठरेल. आपण कृपया मला माहिती द्यावी, त्याप्रमाणे मी पाठपुरावा करेन.

**मिलन पाटील :-**

आम्ही ठराव करतो त्याप्रमाणे अंमलबजावणी करा.

**गजानन भोईर :-**

आज जर ह्याचा विचार झाला नही तर शंभर (पालकांना) माणसांना उद्या महापालिकेत घेऊन येईन. जे आहे, ते स्पष्ट सांगतो.

**मा. सभापती :-**

पहिल्यांदा पावसाची सुरुवात झाली. त्या नवघर शाळेमध्ये पाणी जमले होते. पाणी जमल्यामुळे सन्मा. सदस्य श्री. गजानन भोईर व सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात पाटीलजी ह्यांनी सभेसमोर प्रस्ताव आणला की, शाळेत विद्यार्थ्यांना जाणे-येणे मुश्किल झाले आहे व त्याप्रमाणे आरोग्य विभाग व बांधकाम विभागाला निर्देश दिले की, आपण त्याची पुर्ण कार्यवाही करावी. प्रत्यक्ष जागेवर गेल्यावर दोन्ही खात्याचे प्रमुख तिथे उपस्थित होते. त्यांनी काय कार्यवाही केली? त्यांना त्यात अडचण काय होती? ते सांगा. आपले मैदान त्या ठिकाणी आहे. उपायुक्त साहेब, आपण संबंधित खात्याला विचारुन घ्या व बोला.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

प्रशासनाचे सर्व अधिकारी येथे उपस्थित आहेत. तेथे कोण कोण गेले होते? त्यांनी स्वतःहून सांगा. नामोल्लेख करण्यापेक्षा आपण काय काय केले आणि काय ठरले? जे स्थायी समितीच्या सदस्यांबरोबर व मा. सभापती साहेबांबरोबर उपस्थित होते व त्यांनी जागेवर कोणा कोणाला सुचना दिली? त्यांना विनंती आहे की, त्यांनी स्वतःहून सभेसमोर सांगावे. कारण मी त्या ठिकाणी नव्हतो व मला कोणी नावाचा खुलासा करायला तयार नाही. बेसिकली माझी अडचण वेगळी आहे. म्हणजे माझ्या खांद्यावर बंदूक निश्चितपणे आहे. चापवर बोटपण त्यांचे आहे. परंतु, ते मला सांगायला तयार नाही, तुम्ही शोधुन काढा. ही खरी उपायुक्त साहेबांची जबाबदारी नाही, तरी ते मी शोधून काढतो. तो भाग निराळा आहे. तरी कृपा करुन अधिकाऱ्यांनी उत्तर द्यावे.

**गजानन भोईर :-**

चाप ओढू नका. पण नळी हातात घ्या व दस्ता पाठीवर द्या.

**दिपक खांबित :-**

वन विभागाच्या सभेत वन विभागाचा असा ठराव झाला होता. त्याची कॉपी आम्हांला मिळाली नाही. आपण बघितल्याप्रमाणे आम्ही एस्टिमेट केले आहे आणि आयुक्त साहेबांकडे मंजुरीसाठी पाठवले आहे. जे सी.सी. रोड करायचे आहे, ट्रॅकचा त्याचे एस्टीमेट आम्ही केले आहे. ते मंजुर झाल्यानंतर टेंडर काढण्यांत येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

अति महत्वाचा विषय आहे. त्याकरिता टेंडर कशाला काढायला पाहिजे?

**दिपक खांबित :-**

टेंडर काढले नाही तर काम कोण करणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

ॲडव्हान्समध्ये काम होतात.

**सुर्यकांत भोईर :-**

अवलोकनाचे असते, तसे तुम्ही तुमच्या अखत्यारीमध्ये करुन घ्यायचे होते.

**दिपक खांबित :-**

टेंडर काढून काम करणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, ते काम कधी करणार? पाण्याचा निचरा करायचा, ते काम आपण कधी करणार?

**दिपक खांबित :-**

त्याचे टेंडर निघेल. ते काम प्रोसिजरमध्ये आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, टेंडर काढता-काढता एक महिना होऊन जाईल. तोपर्यत पावासाळा जाईल.

**गजानन भोईर :-**

आयुक्त साहेबांना किती लाख खर्च करण्याची परमिशन आहे? त्यांच्या अखत्यारिमध्ये करायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

काहीही असू द्या. तरी सर्व काम हे टेंडर काढूनच होतात.

**मिलन पाटील :-**

अवलोकनार्थ जे विषय येतात, त्या विषयाचे टेंडर काढले जाते का?

**दिपक खांबित :-**

सर्व कामांचे टेंडर काढले जाते.

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेबांना परमिशन आहे का नाही?

**दिपक खांबित :-**

टेंडर मंजुर करण्याचे दहा लाखाच्या पॉवर्स आहेत.

**मा. सभापती :-**

अवलोकन करतांना टेंडर काढण्याची जी प्रासिजर आहे, ती प्रोसीजर आहे.

**गजानन भोईर :-**

नक्की टेंडर काढूनच कामे होतात का?

**दिपक खांबित :-**

टेंडर आणि सोसायटीमार्फत काम होते.

**सुर्यकांत भोईर :-**

ही पद्धत अशीच आहे का?

**दिपक खांबित :-**

शंभर टक्के काम हे टेंडर काढूनच होते.

**गजानन भोईर :-**

टेंडर काढूनच काम होते हे आपण आम्हांला कसे सांगता?

**सुर्यकांत भोईर :-**

टेंडर काढण्याच्या अगोदर काम चालू झालेले आहे हे दाखवू का सांगा. सभागृहासमोर मी आणतो.

**गजानन भोईर :-**

आपण आम्हांला ते दाखवा.

**प्रभात पाटील :-**

हे इतक्या जरुरीचे काम जर बिना टेंडर झाले असते तर फार मोठी सोय झाली असती.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, प्रत्येक सदस्य पन्नास-पन्नास हजार रुपये देतात, आपण ते काम करुन घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

कामाची आवश्यकता बघूनसुद्धा काही कामे केली जातात.

**गजानन भोईर :-**

आम्ही पैसे देतो, आपण कामाला सुरुवात करा.

**प्रभात पाटील :-**

हे जर बिना टेंडरचे काम झाले असते तर आज हा प्रश्न उपस्थित झाला नसता. आज दोन महिने झाले तिथे मी स्वतः, कुदरे सो., नानेगावकर सो. संपूर्ण शाळेची चौफेर पाहणी केली. ते

महत्त्वाचे काम होते व मागच्या सभेत त्याची ओरडपण झाली होती. तर जे वेळेवर केले असते तर ह्या आठ दिवसामध्ये ते कामही झाले असते.

**गजानन भोईर :-**

ते काम आठ दिवसामध्ये झालेही असते.

**रिटा शाह :-**

महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, टेंडर काढायला, एस्टीमेट काढायला किती वेळ लागतो?

**प्रभात पाटील :-**

किती महिने झाले, तर दोन महिने झाले.

**रिटा शाह :-**

दोन-चार महिने एवढा वेळ लागतो का? काम करायची इच्छा असेल तर एका दिवसामध्ये काम होऊ शकते.

**गजानन भोईर :-**

समजा, एखादा ब्रिज जर कोसळला तर आपण त्यांचे टेंडर काढणार का? पंधरा दिवस त्या ब्रिजसाठी थांबणार का?

**दिपक खांबित :-**

टेंडर काढूनच काम केले जाईल.

**गजानन भोईर :-**

त्याच्या अगोदर काम करणार नाही का? जर मोर्वाच्या खाडीचा ब्रिज कोसळला तर काय करणार? टेंडर काढणार का?

**दिपक खांबित :-**

आर्थिक प्रश्न असेल तर............

**गजानन भोईर :-**

असे कसे बोलता? मुलांच्या अडचणीचा प्रश्न आहे.

**प्रभात पाटील :-**

हा आर्थिक-शैक्षणिक प्रश्न आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण जो प्रश्न मांडला, तर काही कामे अशा पद्धतीने केली जातात, कामाच्या आवश्यकतेनुसार. जरी उपअभियंता साहेबांनी बोलले नाही की, अशा पद्धतीने कामे होत नाही. तर असे काम भाईंदर पश्चिमेमध्ये चालू आहे. सालासरच्या बाजूचे जे रस्त्याचे काम चालू आहे त्याची प्रोसेस झाली का? म्हणजे ते काम प्रोसेसमध्ये आहे. आजच्या तारखेला पावसाचे दिवस बघता, ते काम टिकाव धरेल असे तुम्हांला वाटते का?

**दिपक खांबित :-**

ते काम खाजगी विकासकाकडून होत आहे. महानगरपालिकेतर्फे ते काम केले जात नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

ठिक आहे.

**मा. सभापती :-**

आता विषय असा झाला की, उपायुक्त साहेब, आरोग्य विभागाने ज्या ज्या ठिकाणी भराव आहे त्या त्या ठिकाणी ताबडतोब पहिले गेट जे मुख्य द्वार जे गेट आहे ते गेट लांब आहे. पहिले जे गेट आहे, जे एस. एन. कॉलेजच्या बाजूला गेट येते त्या गेटपासून त्या विद्यार्थ्यांना जाईपर्यंत, आपण दोन ते तीन तासामध्ये असे आरोग्य विभागाला निर्देश द्या की, जिथे जिथे मटेरियल पडले असेल, कपची, रॅबीट असेल किंवा विटांचे मटेरियल असेल ते तिथे ताबडतोब पोहोचते करा.

**प्रभात पाटील :-**

संपूर्ण नवघर रोडचा जो रस्ता डांबरीकरण केला गेला, खडीकरण केला गेला तो मोठा रस्ता होता व लाखाचे-करोडोचे ते टेंडर होते. ते संपूर्ण मटेरियल नवघरच्या ग्राऊण्ड मध्ये पडले होते. आजही जर तेथून मुले चालली तर किती मुलांचे पाय कापतील ते सांगू शकत नाही. आपण जे मेन गेट बोलता, तर मेन गेटपासून डाव्या हाताची सगळी बाजू खडी, मटेरियल, रेतीने जमीनदोस्त झालेले आहे.

**गजानन भोईर :-**

कॉन्ट्रॅक्टरचे तसेच आहे. आपण तलावातून पन्नास ट्रक मटेरियल काढा, आता टाकले मागच्या टेंडरवाल्याने ते तसेच ठेवले होते.

**प्रभात पाटील :-**

संपूर्ण ग्राऊण्ड त्या माणसाने वापरले होते. त्यामुळे ते सगळे मटेरियल तिथेच आहे व ते रुतत गेलेले आहे. तसेच नवघरचा ग्राऊण्ड भाड्याने देण्याचा विषय आला होता तेव्हा नवघरच्या शाळेमध्ये आपण शिरल्यानंतर डाव्या बाजुचे जे गेट आहे व त्याची चावी तिथल्या एका माणसाकडे आहे. तिथल्या सेक्युरिटीने जर ते टाळं बदललं तरी त्या बदललेल्या टाळ्याची चावी ती व्यक्ती करुन आणते आणि पुन्हा पुन्हा त्या गेटचा वापर होतो, हे मी मागच्या वेळीही बोलले होते. आपण त्या गेटला सिल करा. वेल्डिंग करा. कारण तिथे आता टाळे लावायचे काम नाही. त्या गेटचा खाजगीरित्या वापर होतो. मी मागच्या वेळेलाही बोलले होते, तिथल्या सेक्युरिटीला ते लोक जुमानत नाही.

**मा. सभापती :-**

बांधकाम विभागाने तिथे लक्ष द्यावे व तो गेट ताबडतोब आजच्या आज बंद करुन घ्या. टाळे लावून तो गेट बंद करा अन्यथा वेल्डींग करुन पुर्णपणे बंद करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

वेल्डिंग करुन बंद करा. जर त्या गेटचा उपयोग होत नसेल तर वेल्डिंग लावून बंद करा.

**मा. सभापती :-**

नवघर शाळेजवळ जे गेट आहे ते सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांच्या घराच्या बाजुला तो गेट आहे. त्या गेटमधून जाणे-येणे नाही व त्या शाळेला दोन पर्यायी गेट आणखीन आहेत. म्हणून तो गेट वेल्डींग करुन कायम स्वरुपी बंद करुन घ्या.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, हे पावसाळी काम सिटी इंजिनिअर साहेबांना कामाची आवश्यकता वाटत नाही का? सिटी इंजिनिअर सभेला हजर नाहीत.

**प्रभात पाटील :-**

या महानगरपालिकेत रात्रदिन आम्हा युद्धाचा प्रसंग, नेहमीच युद्धाचे प्रसंग असतात. परंतु, अधिका-यांना ह्याचे काहीही पडलेले नसते.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईरजी, नवघर शाळा क्र. १३, पटांगण जॉकींग ट्रॅक करण्यासाठी नऊ लाख अठ्ठ्याऐंशी हजाराचे एस्टीमेट मंजुर केलेले आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, आरोग्याचा विषय चालू आहे तर सध्या पावसाळा आहे. त्याकरिता वॉर्डामध्ये जास्त कर्मचारी पाहिजे. तर सर्व ठेकेदारांनी माणसे कमी केलेली आहेत. ती माणसे आमच्याकडे सारखी येतात की, ठेकेदाराने आम्हांला कामावरुन काढून टाकले आहे. त्यांना कामावरुन काढून टाकल्यामुळे ते आमच्याकडे येतात. आम्ही त्यांना काय उत्तर द्यायचे.

**केशव घरत :-**

आमच्या प्रभागामध्ये फक्त दोन कामगार आहेत. बाकीचे सर्व पल्स पोलिओ मोहिमेकरिता गेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

माझ्या प्रभागामध्येसुद्धा चार कामगार काम करत आहेत. पल्स पोलिओकरिता आपण कामगार घेता व आता पावसाचा मौसम आहे, कुठे माणसे पाहिजे......

**अनंत पाटील :-**

आरोग्याकरिता आपल्याला कामगार पाहिजे. आपल्याकडे बरेचसे कामगार कमी आहेत.

**मा. सभापती :-**

पल्स पोलिओची मोहिम सुरु असल्या कारणाने प्रत्येक सभेला हा प्रश्न निर्माण होतो. त्याकरिता आरोग्य विभागाला मी असे रुलिंग देतो की, पंधरा दिवसापुरते अनकॉन्ट्रॅक्ट माणसे घेऊन ती कामे पुर्ण करण्यात यावीत.

**केशव घरत :-**

साहेब, हा नेहमीचा प्रश्न आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हा प्रत्येक महिन्याचा प्रश्न आहे. मी मागे रिपोर्ट मागितला होता, त्याचे मला अजून उत्तर मिळाले नाही.

**मा. सभापती :-**

पंधरा दिवस अनकॉन्ट्रॅक्टवर माणसे घेऊन आणि सन्मा. सदस्या रिटा शाहजी ह्यांचा असा प्रश्न आहे की, ठेकेदाराने कामगार कमी केलेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

कामगार कमी कुठे केले आहेत? फक्त पल्स पोलिओ मोहिमेकरिता घेतले आहे ना?

**रिटा शाह :-**

माझ्याकडे जे कामगार आले होते त्यांना दोन-तीन वर्षे झाली. त्यांना कामावरुन काढण्यांत आलेले आहे.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, रेल्वेमध्ये जशी कौआभरती करतात, तशी कौआभरती, मे-जून महिन्यात पल्स पोलिओ मोहिमेकरिता भरती करण्यांत यावी.

**मा. सभापती :-**

आपण तसे करतोय.

**मिलन पाटील :-**

मागच्या वेळेलाही सांगितले होते की, टेम्परररी भरती करा. जे सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना काम मिळेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही मुलांना पाठवले होते. हे त्या मुलांना घेत नाही. त्यांना परत पाठवले.

**प्रभात पाटील :-**

पोलिओ हा रोग कसा होतो, तर शहरामध्ये अस्वच्छता आणि घाण ह्यामुळे पोलिओ रोग होतो. आपण कुँवारा बाप सिनेमा बघितला असेल. पल्स पोलिओकरिता आपली सफाईची मुले आपण तिथे घेतो आणि घाणी वाढवतो. पल्स पोलिओ ह्या शहरातून कमी होणार नाही. उलट सर्वांना पल्स पोलिओ होईल. आज शहरात अशी परिस्थिती आहे की, सगळ्यांना पोलिओ होईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याला जबाबदार कोण?

**मा. सभापती :-**

डॉक्टर साहेब, आपण अनकॉन्ट्रॅक्टवर पंधरा दिवसांकरिता माणसे घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण प्रत्येक वेळेला सांगता, पण तसे काम होतच नाही.

**केशव घरत :-**

जिथे चौदा माणसे काम करतात, तिथे फक्त दोन माणसे काम करतात. ते कसे शक्य आहे?

**मिलन पाटील :-**

डॉक्टर साहेब, आपण आम्हांला आश्वासन तरी द्या की, काम करु.

**मा. सभापती :-**

पंधरा दिवसांकरिता आपण टेम्परररी माणसे घेऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

झाले नाही तर तुम्ही काय कार्यवाही कराल ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रत्येकाने तीस-तीस माणसे द्या. तरी त्याच्यावर काहीही कार्यवाही केलेली नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्ही माणसे पाठवतो, त्या माणसांना घेतसुद्धा नाही.

**मा. सभापती :-**

आपण आमच्याकडे नांव द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही पाठवलेल्या व्यक्तींना त्यांनी परत पाठवले.

**प्रभात पाटील :-**

त्या माणसांना परत पाठवले की, आमच्याकडून तुम्हांला काही मिळणार नाही.

**केशव घरत :-**

फक्त पंचवीस रुपये मिळतील म्हणून डॉक्टरांनी सांगितले आहे.

**प्रभात पाटील :-**

येथे सांगताना एक सांगाता आणि करताना दुसरे करतात.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक ठिकाणी पैसे खिशात काढायचे म्हटले तर कसे चालेल?

**मिलन पाटील :-**

आपण त्या कामगारांना रोज काय देणार?

**मा. सभापती :-**

तीस रुपये आणि चाळीस रुपये पल्स पोलिओचे आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

१२५ रुपये देतात.

**मा. सभापती :-**

पल्स पोलिओचा त्यांचा हा रेट आहे आणि आपण जे कामगार घेणार आहोत त्यांना १२५ रुपये देऊ करणार.

**प्रभात पाटील :-**

असेच सांगितले होते आणि जेव्हा मुले ट्रेनिंगला गेली तेव्हा पंचवीस रुपये व चहापाणी देणार असे सांगितले.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण डॉक्टर साहेबांना असाच निर्देश दिला होता.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, पल्स पोलिओ लसीकरणासाठी जे अनुदान उपलब्ध होते, त्यामध्ये प्रत्येक व्हॉलेन्टीयर किंवा कामगार असेल किंवा आपले कर्मचारी हे बुथवर काम करतात. शासनाच्या अनुदानातून पंचवीस रुपये त्यांना नियमानुसार जो पल्स पोलिओसाठी काम करतो त्यांना देतो. मागच्या वेळेला त्यांना १२५ रुपये देण्याबाबत चर्चा झाली होती. हा खर्च महानगरपालिकेकडून करायला लागेल. यासाठी आपल्याला एक पर्याय असा काढता येईल की, मा. सभापती साहेबांनी सांगितले व सन्मा. सदस्य भोईर साहेबांची मागणी आहे की, जे कामगार नालेसफाईकरिता जे तात्पुरते कामगार घेतले होते, हे कामगार आपण परत बोलावू. पंधरा दिवसांकरिता त्यांना कामावर घेऊन व पुढच्या पल्स पोलिओच्या अगोदर परत त्या कामगारांना बोलवू. पण आता जे कामगार पल्स पोलिओकरिता काम करतात त्यांना विभागा माहिती आहे, घर माहिती आहे, इमारती माहिती आहेत आणि ते व्यवस्थित काम करतात. त्याचे काम चालू ठेवू आणि पल्स पोलिओच्या मोहिमेच्या वेळेला पंधरा दिवसांसाठी आवश्यक असणारे कामगार प्रत्येक वेळेला आपण घेऊ असा मी आज आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव मांडतो आणि मंजुर करुन घेतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

पल्स पोलिओ मोहिम असल्यामुळे सफाई कामगार येत नाहीत. त्यांना तुम्ही भर पगार देता का?

**डॉ. बावस्कर :-**

पल्स पोलिओची मोहिम राबवताना इतर महानगरपालिका किंवा जिल्हापरिषद जे कामगार किंवा जे कर्मचारी पल्स पोलिओकरिता काम करतात त्यांना त्यांचे नेहमीचे वेतन मिळते. त्याच्या व्यतिरिक्त पंचवीस रुपये हे शासनाकडून अनुदान आहे. आपल्याकडे सफाई कामगार, क्लार्क व इतर कर्मचारी उपलब्ध नाही. त्यामुळे कामगारांमधून ते कामगार ठेकेदाराचे असे की, आपले असो. आपले मुकादम, इन्स्पेक्टर, क्लार्क काम करतात व जे कर्मचारी काम करतात त्यांना त्यांच्या पगाराच्या, वेतनाच्या व्यतिरिक्त पंचवीस रुपये हे शासनाचे अनुदान द्यायचे असते. ते नियमानुसार आपण सर्वांना देतो.

**मिलन पाटील :-**

डॉक्टर साहेब, माझा असा प्रश्न आहे की, आपण जे कर्मचारी घेता, ते ठेका पद्धतीने आपण जे सफाई कामगार घेतो, ते ह्या ठेकेवाल्याकडून घेतो का प्रायव्हेट असे कोण घेतो?

**डॉ. बावस्कर :-**

सफाईकरिता ठेकेदाराच्या ठेक्यामध्ये कामगार काम करतात. तेच कर्मचारी त्या विभागामध्ये काम करतात व त्यांच्याकडूनच आपण हे काम करुन घेतो.

**मिलन पाटील :-**

त्याला पैसे कोण देतो? ठेकेदार देतो की आपण देतो?

**डॉ. बावस्कर :-**

डबल पगार किंवा डबल वेतन हे कुणालाही दिले जात नाही.

**मिलन पाटील :-**

मग त्यांना पैसे कुठून मिळतात?

**डॉ. बावस्कर :-**

ते ठेकेदाराकडूनच मिळतात. आपण फक्त पंचवीस रुपये शासनाकडून आलेले अनुदान आपल्या स्टाफला देतो व नियमानुसार जे पल्स पोलिओचे काम करतील त्यांना पंचवीस रुपये द्यायचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्याला शासनाकडून किती रक्कम येते?

**डॉ. बावस्कर :-**

शासनाकडून पल्स पोलिओच्या कर्मचाऱ्यांना घरोघरी भेटी देण्याकरिता किंवा बुथवर काम करण्याकरिता प्रत्येक कर्मचाऱ्या मागे पंचवीस रुपये दिले जातात.

**सुर्यकांत भोईर :-**

पल्स पोलिओ मोहिमेकरिता किती कामगार आहेत?

**मिलन पाटील :-**

डॉक्टर साहेब, आपणाला आमचा प्रश्न समजला नाही. आम्ही काय सांगतो, आरोग्याच्या ठेकेदाराला आपण जे देतो, ते अमुक एक एकशे पंचवीस किंवा एकशे दहा रुपये देतो, तो भाग वेगळा आहे. आता आरोग्याचे हे पल्स पोलिओकरिता आपले जे सेपरेट अनुदान आहे, ह्या अनुदानाबरोबर आपले जे अनुदान आहे, म्हणजे डबल पगार होतो. आपण ठेकेदाराचे पैसे कापता का?

**प्रेमनाथ पाटील :-**

पैसे कापत नाही, ते त्याच्यामध्ये ॲडजस्ट होतात.

**डॉ. बावस्कर :-**

ह्यामध्ये कोणालाही डबल पगार होत नाही. आपण ठेकेदाराला आरोग्याचे जे मंन्थली पेमेन्ट देतो, तोच पेमेन्ट त्यांना दिला जातो. परंतु, शासनाचे अनुदान जे हे काम करतात, जर आपले कर्मचारी असतील, फुलटाईम किंवा बाहेरचे कर्मचारी असतील, ठेकेदाराचे असतील तर हे अनुदान म्हणजे भत्ता असतो. हा पंचवीस रुपये भत्ता प्रत्येकाला दिला जातो.

**मिलन पाटील :-**

आपल्याकडे जे ऑक्ट्रॉय चालू होते. तर अतिरिक्त माणसे आपल्याकडे होती. ५३८ आपण जे परमनन्ट केलेले आहेत. एका ऑफीसला तीन ते चार प्युन आहेत. ते प्युन आपण बाहेर का काढत नाही? अतिरिक्त जी ठेक्यात माणसे होती, आज आपण ठेका पद्धत बंद केली तर ती माणसे पटकन ऑक्ट्रॉयला येतील. ती माणसे तुम्ही का फिरवीत नाही? एका ऑफीसरकडे तीन ते चार प्युन आहेत. त्यातला एक प्युन आवश्यक आहे. एक प्युन ठेवा, दोन प्युन बाहेर काढा. त्या पद्धतीने तुम्ही तसे का करत नाही? म्हणजे तेही पैसे वाचतील. ते आपले स्वतःचे कर्मचारी आहेत. उद्या जर त्यांनी कोणत्या कामात हयगय केली तर आपण त्यांच्यावर कार्यवाही करु शकतो. ह्या पद्धतीच्या कामगारांवर आपण काय कार्यवाही करु शकतो.

**डॉ. बावस्कर :-**

आय.पी.पी.आय., घरोघरी व्हिजीट देण्यासाठी तीनशे एकोणीस टीम आहेत. एका टिममध्ये दोन माणसे असतात. म्हणजे आपल्याला ६३८ कामगार आणि त्याचे ५८ सुपरवायझर हे आपले कर्मचारी असतात. महानगरपालिकेचे जे आरोग्याचे कर्मचारी आहेत ते सुपरवायझर त्याच्यावर दिलेले आहे. असे ६३८ आपले कर्मचारी आहेत. आपल्या कार्यालयातून एवढे कामगार उपलब्ध होऊ शकत नाही किंवा एवढे शिपाई उपलब्ध होऊ शकत नाही. इव्हन पल्स पोलिओच्या रविवारच्या दिवशीसुद्धा मोठ्या मुश्किलने काही कर्मचारी उपलब्ध होतात. सध्या आर्थिक गणना चालू होती, त्याच्यामुळे लिपीकसुद्धा उपलब्ध झाले नाही, शिपाईसुद्धा उपलब्ध झाले नाहीत. फार मोठी कसरत असते. ह्याच्यामध्ये फार मोठी अडचण असते आणि जो निर्णय आपण घ्याल तो निर्णय आम्ही नक्कीच अंमलात आणू. परंतु, ह्याच्यामध्ये खुप अडचणी असतात.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, आज जे काही ठरले, जो काही पिक्चर आहे तो आपल्यासमोर आहे. नेहमी नेहमी आम्ही सभासद ओरडतो. जेव्हा जेव्हा पल्स पोलिओ मोहिम होती की, आरोग्य विभागाचे कर्मचारी आपण त्या बाजुला ट्रान्सफर करतात. अतिक्रमणचे काही काम असेल तर आरोग्य विभागाचे कर्मचारी ट्रान्सफर करतो. तर आरोग्याचा हा विषय संपुर्ण मिरा भाईंदर शहरातील लोकांच्या आरोग्याचा हा विषय आहे आणि जर आरोग्य बरोबर राहिले नाही, साफसफाई झाली नाही, मिरा भाईंदर शहरामध्ये महानगरपालिका आहे व असे अस्तित्व करायचे, त्याला काही अर्थच राहिला नाही. म्हणून मी असा ठराव मांडत आहे की, आरोग्य विभागामधून एकही कर्मचारी, महानगरपालिकेच्या कुठल्याही कामाकरिता ट्रान्सफर करायचा नाही असा मी ठराव मांडत आहे.

**प्रभात पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ठराव क्र. ४२ :-**

मि.भा.म.न.पा. क्षेत्रात पल्स पोलिओ मोहिम राबवणे अथवा म.न.पा.च्या इतर कोणत्याही कामकाजासंदर्भात आरोग्य विभागातील स्थायी वा अस्थायी (रोजंदारी - ठेकेदाराकडील) कोणत्याही कर्मचाऱ्यास कामाला घेऊन नये असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्रीम. प्रभात पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**हॅरल बोर्जीस :-**

ह्याच्या अगोदरदेखील ठराव झाले होते व त्याची इम्प्लिमेंट कुठपर्यंत होते त्याची शंका आहे.

**प्रभात पाटील :-**

पुढचा विषय हा इम्प्लिमेंटचाच असेल. सचिवजी ह्या ठरावाची नोंद करुन घ्या की, ह्याच्यापुढे स्थायी समिती सुरु होताना आम्ही त्या ठरावाचे काय झाले म्हणून विचारु.

**रिटा शाह :-**

साहेब, सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी ह्यांनी सांगितले की, एक-एका ऑफीसमध्ये तीन ते चार प्युन असतात व ते केबिनमध्ये बसून गप्पा मारत असतात. तर एका केबिनमध्ये एक प्युन ठेवा.

**डॉ. बावस्कर :-**

मॅडम, ऑफीसचे प्युन जरी काढले तरी जास्तीत जास्त सात-आठ प्युन निघू शकतील.

**रिटा शाह :-**

पल्स पोलिओ मोहिमेला तुम्ही अतिरिक्त ठेक्यावर घ्या ना. पंधरा दिवसाच्या बेसवर किंवा एक महिन्याच्या. तुम्हांला माहिती असते की, केव्हा पल्स पोलिओ मोहिम असते. त्याच्या अगोदर तुम्ही ठेका पद्धतीवर स्टाफ मागवून घ्या.

**डॉ. बावस्कर :-**

माझे तेच म्हणणे होते. आधी मी जे निवेदन केले, ठेक्यावर आपण स्टाफ मागवून घेऊ. परंतु, आता जे कर्मचारी पल्स पोलिओकरिता काम करतात त्यांना संपुर्ण माहिती आहे आणि ह्यामध्ये एकही घर सुटणार नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, पल्स पोलिओ मोहिम करु नका असे आम्ही बोलत नाही. पण तुमचा जेव्हा पल्स पोलिओचा कार्यक्रम असेल, ते तुम्हांला दहा दिवस अगोदर माहिती असेल, तर तेव्हा तुम्ही दहा दिवस अगोदर ठेक्यावर माणसे घ्या. आम्ही कुठे नाही बोलतो. पण आरोग्य विभागाची माणसे तुम्ही ट्रान्सफर करु नका.

**डॉ. बावस्कर :-**

ठेक्यावर माणसे घेऊ व त्या माणसांना आपण साफसफाईचे काम लावू आणि सध्या जे कामगार काम करतात त्यांना संपुर्ण माहिती आहे. कारण हा प्रोग्राम अतिशय महत्त्वाचा आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, आरोग्य विभागात जी माणसे साफसफाईचे काम करतात त्यांना कुठल्या गटाराची साफसफाई कशी करायची, कुठल्या गटाराची लेव्हल कुठे आहे, कुठून साफ करायचे ते त्यांना बरोबर माहिती आहे. नविन आणलेल्या माणसांना काहीच माहिती नाही.

**डॉ. बावस्कर :-**

ठिक आहे मॅडम, आम्ही कॉन्ट्रॅक्टच्या माणसांना घेऊ, त्यांना दोन दोन वेळा ट्रेनिंग देऊ, त्यांना एरिया दाखवू व काम करुन घेऊ.

**रिटा शाह :-**

आपण सध्या जे आरोग्यावर काम करतात, त्या कर्मचाऱ्यांना पावसाळ्या दरम्यान कुठेही ट्रान्सफर करु नका अशी आमची मागणी आहे.

**डॉ. बावस्कर :-**

फक्त आपल्या ठरावामध्ये एवढा उल्लेख करा की, पल्स पोलिओसाठी कॉन्ट्रॅक्टवर माणसे घ्या.

**रिटा शाह :-**

तुम्ही कुठून वेगळी माणसे आणा. पल्स पोलिओ मोहिमेचे काम अवघड नाही आणि साफसफाई हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

**केशव घरत :-**

साहेब, संपुर्ण आरोग्य विभागाचे कर्मचारी किती आहेत?

**डॉ. बावस्कर :-**

आरोग्य विभागाचे पुर्ण बाराशे पन्नास कर्मचारी आहेत.

**केशव घरत :-**

बाराशे पन्नास कर्मचारी राबविले जातात का?

**डॉ. बावस्कर :-**

नाही.

**केशव घरत :-**

माझे म्हणणे असे आहे की, माझ्या प्रभागात फक्त दोन कर्मचारी आहेत. एका एका प्रभागातून जर पंचवीस माणसे गेली तर काम कसे होईल ते सांगा. आपण निम्मी माणसे घ्या, निम्मी माणसं कमी करा.

**डॉ. बावस्कर :-**

ठिक आहे. साहेब, आपण जे ठरवाल ते.

**केशव घरत :-**

आम्ही निम्मी माणसं फिरवा आणि एका प्रभागात, घरात रोज जायला पाहिजे का? एका प्रभागात साधारणतः किती दिवस पल्स पोलिओकरिता जावे लागते.

**डॉ. बावस्कर :-**

ह्याचे प्लानिंग केलेले असते. सोमवारी म्हणजे आता जी पल्स पोलिओची मोहिम सुरु झाली, २६ तारखेला रविवारी बुथवर आपल्याला पल्स पोलिओची मोहिम राबवायची होती आणि महानगरपालिकेचे २९० बुथ होते आणि ह्या २९० बुथमधून आपण सगळी मेहनत घेऊन मोठ्या प्रमाणामध्ये सगळी यंत्रणा राबवून आपण ६४ हजार मुलांना डोस पाजले. त्यानंतर आपले एस्टीमेट असते, तो एक अंदाज असतो की, आम्हालां जवळजवळ ऐशी हजार मुलांना डोसेस पाजायचे असतात. त्यापैकी ६४ हजार २६ तारखेला पाजले गेले व जे उरलेले आहेत, जी मुले कव्हर करायची आहेत त्याचे पुढचे प्लानिंग असते की, प्रत्येक विभागाचा जसे भाईंदर वेस्टमध्ये आपण दोन विभाग केलेले आहेत, उत्तनचा एक विभाग आहे, काशिमिराचे एक विभाग आहे, भाईंदर पुर्वेचे दोन विभाग केलेले आहेत आणि मिरा रोडचा एक विभाग केलेला आहे. या प्रत्येक दिवसाचे पाच दिवसाचे प्लानिंग असते की, पहिल्या दिवशी किती घरं घ्यायची, दुसऱ्या दिवशी किती घरं घ्यायची. एका टिमला एका दिवसांत फक्त एकशे साठ घरांचा सर्व्हे करायचा असतो. त्यांना पुन्हा पुन्हा भेटी द्यायच्या असतात आणि प्रत्येक घरामध्ये एकही मुल राहणार नाही, डोस पाजल्यावाचून आणि ह्यांच्या चेकिंगसाठी ह्यांचे सुपरवायझर फिरतात. याच्या व्यतिरिक्त जागतिक आरोग्य संघटनेने आपल्या महानगरपालिकेमध्ये त्यांना विनंती केली की, तुमचे मॉनिटर्स पाठवा. जागतिक आरोग्य संघटनेने प्रत्येक विभागासाठी एक एक त्यांचा मॉनिटर्स पाठवलेला आहे आणि तो स्वतंत्र फिरतो व स्वतंत्ररित्या त्याची पाहणी करतो. ह्याचा अहवाल शासनाला जातो, केंद्र शासनाला जातो व जागतिक आरोग्य संघटना सगळ्या लोकांना चेक करतात. त्यांचे सुपरविझन करत असतात. अशा प्रकारे आपली ही पल्स पोलिओची मोहिम राबविली जाते. जो निर्णय आज आपला झाला तर फक्त आम्हाला मुभा द्या की, पल्स पोलिओकरिता पंधरा दिवसाकरिता ठेक्यावर माणसे घेण्यासाठी व आपली साफसफाईचे माणसे तिथेच काम करतील आणि जे कामगार ठेक्यावर घेतले जातील त्यांना आम्ही ट्रेनिंग देऊन, त्यांना पुन्हा पुन्हा एरिया दाखवू. सुरुवातील अडचण निर्माण होईल. परंतु, काही दिवसानंतर हे कामगार काम करु शकतील.

**रिटा शाह :-**

साहेब, जे कर्मचारी आरोग्य विभागात साफसफाईचे काम करतात त्यांना तेच काम करु द्या आणि पल्स पोलिओकरिता इतर माणसे घ्यावी लागतील तर ते आपण ठेक्यावर घ्या. त्याच्यावर आमचे ऑब्जेक्शन नाही. पण महत्वाचा मुद्दा सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी ह्यांनी उचलला, पल्स पोलिओ मोहिमेला शासनातर्फे पंचवसी रुपये येते, ते तुम्ही आतापर्यंत देत होता. मग ते ठेक्यावर काम करणारे पल्स पोलिओकरिता येतात तेव्हा त्यांना १२५/- रुपये देता की, १२५ प्लस २५ असे देतात?

**डॉ. बावस्कर :-**

जे ठेकेदार वेतन दिले जाते ते प्रत्येक कामगाराला वेतन दिले जाते.

**रिटा शाह :-**

साहेब, मी ठेकेदाराचे विचारत नाही. जेव्हा पल्स पोलिओ मोहिमेला ती माणसे मागावर येतात तेव्हा त्यांना आपण २५/- रुपये देतो की, १२५ प्लस २५ रुपये असे देतो.

**डॉ. बावस्कर :-**

१२५ प्लस २५ हे प्रत्येक कामगाराला द्यायचे. पण आपल्या कर्मचाऱ्याला आज जर लिपीकाचे पगार मिळत असेल तर त्याच्या व्यतिरिक्त हे अनुदान असते.

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय, स्थायी समितीमध्ये २०/०४/२००५ ला वारसा अनुकंपा पद्धतीने भरती करतो, त्या विषयाची अंमलबजावणी का झाली नाही? त्याला आज एक वर्ष झाले तरी त्याची अंमलबजावणी का होत नाही? प्रशासनाने त्याचा खुलासा करावा.

**सुर्यकांत भोईर :-**

अधिकाऱ्यांचे विषय असतील तर त्याची अंमलबजावणी ताबडतोब होते.

**प्रभात पाटील :-**

अधिकाऱ्यांचे वेतनवाढ असो, पदोन्नती असो, त्याची अंमलबजावणी ताबडतोब होते.

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे काय उत्तर आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील, आपला जो विषय आहे त्याची माहिती उपायुक्त (मुख्यालय) घेऊन त्यानंतर ते तुम्हांला त्याचा खुलासा देतील.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस ह्यांनी उपहारगृहाचा जो विषय मांडला त्याच्या बाबतीत काय झाले?

**गजानन भोईर :-**

शाळेच्या विषयचे काय झाले?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

खांबितजी बोलले ना की, सात दिवसामध्ये रोड करणार.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, एवढा गांभिर्याचा विषय, उपहारगृहाचा त्याचा ठराव मांडला तरी त्याचे इम्प्लिमेंन्टेशन झाले नाही आणि उपरोक्त विषया संदर्भामध्ये जी माहिती देण्यासाठी येथे एकही अधिकारी उपलब्ध नाही. श्री. विजय पाटील हे रजेवर आहेत असे कळते. पण त्यांच्या अनुपस्थितीमध्ये दुसरा अधिकारी असेल ना? त्यांना बोलवा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हा जो विषय आहे, तो सभेसमोर नव्हता. म्हणून त्या बाबतीत कुठलीही माहिती उपलब्ध केलेली नाही. आपण अचानक प्रश्न उपस्थित केलेला आहे. तरीसुद्धा आम्ही माहिती देऊ. पण आता ताबडतोब हा रेग्युलर विषय असता तर आम्ही संपुर्णपणे सक्षमपणे ती माहिती देऊ शकलो असतो. पण आता देऊ शकत नाही अशी अडचण आहे.

**प्रभात पाटील :-**

आपली अडचण आम्हांला मान्य आहे. परंतु, विजय पाटील हे मिरा रोडला गेले असे कळले. तर ते मिरा रोडच्या ऑफिसला असायला पाहिजेच किंवा कर्मचाऱ्यांना सांगून गेले पाहिजे की, मी कुठे जातो किंवा काय? स्थायी समितीमध्ये महत्वाचा विषय चालू असतांना जर संबंधित अधिकारी कुठेतरी आहे हे एवढे निदान प्रशासनाला माहिती असायला पाहिजे की, मी कुठे आहे किंवा काय आहे? आज एक तास जास्त झाला, आपण त्यांना शोधतोय. आपले शहर एवढे मोठे नाही. त्या विषयाचे काय करणार? त्याची पुर्तता, त्याची कार्यवाही बाकी आहे. सभापती महोदय, मला असे वाटते की, सचिव साहेबांकडे तो ठराव आलेला आहे. त्याचे काय करणार हे सभापती साहेबांनी सांगावे.

**प्र. सचिव :-**

ठराव आता आलेला आहे.

**मा. सभापती :-**

ठराव जे आपण करतो ते इम्प्लिमेंन्टेशनकरिता करतो तर ठरावाचे इम्प्लिमेंन्टेशन हे झाले पाहिजे.

**प्र. सचिव :-**

ठराव आता दिलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

मग आपण पुढे काय करणार आहात?

**प्र. सचिव :-**

संबंधित खात्याला कार्यवाही करण्यांकरिता ठराव देण्यांत येईल. कॉपी सर्टिफाय करुन लगेच खात्याला देण्यात येईल.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

जो ठराव झाला तो ठराव संबंधित खात्याला दिलेला नव्हता. तो ठराव आता देऊन त्याची कार्यवाही करण्यांत येईल.

**प्रभात पाटील :-**

हा ठराव खात्याकडूनच आपल्याकडे आला.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण आजच्या आज हा ठराव सर्टिफाय करुन द्या.

**प्रभात पाटील :-**

संबंधित खात्याचे कर्मचारी उपस्थित आहेत, त्यांच्याकडूनच हा ठराव सचिवांना देण्यांत आलेला आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

स्थायी समितीमध्ये चर्चा होऊन हा ठराव संबंधित खात्याकडे पाठविला तोपर्यंत इम्प्लिमेंट झाले नाही. म्हणून आपण ३० तारीख हे बुक करा. आम्ही ह्याच्यावर लगेच चर्चा करुन घेतो की, ह्या विषयाचे काय करायचे?

**प्रभात पाटील :-**

परत चर्चा का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हा ठराव त्यांच्याकडे आलेलाच नव्हता व ह्याची नेमकी परिस्थिती काय आहे?

**रिटा शाह :-**

साहेब, महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, स्थायी समितीच्या सदस्यांनी चर्चा करुन नंतरच ठराव दिलेला असतो. ठराव झाल्यानंतर आपण काय चर्चा करणार आहात?

**प्रभात पाटील :-**

ठराव झाल्यानंतर आपण काय चर्चा करणार? हे असे प्रवाहाच्या वेगळ्याच बाजूने आपण चालायला लागले आहात.

**गजानन भोईर :-**

चर्चा करणार की, अंमलबजावणी करणार?

**मा. सभापती :-**

सदर विषयाचा ठराव दिलेला आहे. तो सचिवांना प्राप्त झाला नव्हता. आता ठराव सचिवांकडे प्राप्त झालेला आहे व तो कार्यवाहीकरिता पाठविण्यांत येईल व त्यावर कार्यवाही व्हावी.

**प्रभात पाटील :-**

उपायुक्त साहेब म्हणतात की, आम्ही त्याच्यावर चर्चा करु. तर आता कसली चर्चा?

**मा. सभापती :-**

आता कसली चर्चा?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

म्हणजे आपण आता त्याच्यावर चर्चा करता आहात ना?

**प्रभात पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपण म्हणालात की, आम्ही त्याच्यावर चर्चा करु आणि निर्णय घेऊ. असे कसे?

**मा. सभापती :-**

या ठरावावर आपण चर्चा केलेली आहे. हा ठराव सचिवांना प्राप्त झाला नव्हता. आता हा ठराव सचिवांना प्राप्त झालेला आहे व तो संबंधित खात्याकडे पाठवून त्याची कार्यवाही करण्याकरिता देण्यात आलेला आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सचिव विभागाकडून आम्हांला ठराव प्राप्त झालेला व त्याच्यावर यथावकाश कार्यवाही होईल.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आतापर्यंत स्थायी समितीमध्ये मी सदस्य झाल्यापासून किती ठराव पास झाले व किती ठराव अंमलात आलेले आहेत व काय काय कार्यवाही झाली ते आपण आम्हांला सभागृहामध्ये दाखवा.

**मा. सभापती :-**

सदरच्या विषया संदर्भामध्ये मागच्या वेळेला विषय घेतला होता व तो पुढच्या सभेला विषय आणतोय, आढावा घेणेबाबतचा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३९ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

दि. ३०/०३/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेबाबत मी ठराव मांडत आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ३९ :-**

दि. ३०/०३/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४४ :-**

दि. ३०/०३/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. मॉरस रॉड्रीक्स.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, पुढच्या विषयाला सुरुवात करणे अगोदर सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी ह्यांनी आपल्याला पत्र दिलेले आहे. डॉ. एस्. एस्. पानपट्टे ह्यांची कायम नियुक्तीबाबत मा. महासभेमध्ये विषय ठेवणेबाबत. माझी आपणाला अशी विनंती आहे की, आपले जे कर्मचारी आहेत.......

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ह्यांचा एकदा विषय झालेला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

ठराव त्या संदर्भामध्ये झालेला आहे. परंतु, आपले जे कर्मचारी आहेत त्यांच्या पदोन्नतीचा विषय पेंन्डींग आहे. प्रथमतः हा विषय तुम्ही विषयपटलावर घ्या आणि त्याच्यानंतर हा विषय मा. महासभेसमोर ठेवण्यांत यावा, अशी मी विनंती करतो. सन्मा. सभापती महोदय, डॉ. एस. एस. पाणपट्टे ह्यांचा कायम नियुक्तीबाबतचा जो विषय आहे, मा. महासभेसमोर ठेवणेबाबत, आपल्या अधिका-यांच्या पदोन्नतीचा जो विषय रेंगाळत पडलेला आहे, तो विषय अगोदर मार्गी लावा आणि त्याच्यानंतर हा विषय मा. महासभेसमोर ठेवा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सदरचा विषय मी, सभापती असताना त्याचा ठराव शासनाकडे मंजुरीकरीता गेलेला आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

आपण एकाला न्याय व दुस-याला दुसरा न्याय असे देऊ शकत नाही. सर्वांना समान न्याय दिला गेला पाहिजे. त्या हेतुने आम्हाला ह्यांच्यावर अन्याय करायचा नाही. परंतु, त्याचबरोबर आपल्या कर्मचा-यांवर ही अन्याय नाही झाला पाहिजे. त्या विषयान्वये हा विषय आपण त्या पद्धतीने करावा.

(सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी एस.एस. पाणपट्टे ह्यांच्या नियुक्तीचे जे पत्र दिले होते, त्या पत्राचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मा. सभापती :-**

प्रवेशकाळाचा कालावधी जो आपण एक वर्ष सांगता, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेत तसा ठराव पारित करण्यांत आला होता. त्या विषयाला अनुसरुन सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी, हॅरल बोर्जीसजी आणि प्रेमनाथ पाटीलजी ह्यांनी पत्र दिले होते की, सध्या मागच्या स्थायी समितीला आपले जे कर्मचारी आहेत त्यांना पदोन्नती मिळावी. याबाबत विषाय घेण्यांत आला होता आणि त्याच्या सेवाशर्ती आपणासमोर आलेल्या आहेत. पुढच्या सभेला आपण हा विषय घेणार होतो आणि तत्पुर्वी शासनाकडुन जी ऑर्डर आलेली आहे. त्या ऑर्डरबाबत विविध सदस्यांनी पत्र दिले. त्या संर्दभामध्ये येथे ही चर्चा घेतलेली आहे. सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी प्रवेशकाळ एका वर्षाबद्दल ह्याचे पत्रही दिलेले आहे आणखीन काय खुलासा करायचा असेल तर तो खुलासा आपण करावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी ठराव ही मांडु इच्छितो.

(सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून सर्वानुमते कायम करण्यांत आला.

**ठराव क्र. ४३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर डॉ. श्री. एस्. एस्. पानपट्टे यांच्याबाबत दि. ०५/०६/२००४ रोजी ठराव क्र. १५ पारित करण्यांत आलेला होता. सदर तारखेपासून श्री. पानपट्टे यांनी कोणतीही भरीव कामगिरी केलेली नाही व पूर्णपणे अत्यंत असमाधानकारक काम आहे. त्यांची फक्त पशुसंवर्धन कामासाठीच सदरची नियुक्ती करण्यांत आलेली आहे. सदरची नियुक्ती पुर्णपणे नवीन असल्या कारणाने सदर नियुक्तीचा परिविक्षादिन कालखंड एक वर्षाचा निश्चित करण्यांत येत असून सदर कालावधीत केव्हाही त्यांना सेवेतून कार्यमुक्त करण्याचा अधिकार स्थायी समितीस राहिल. तसेच सदरचा परिविक्षादिन कालावधी संपलेनंतर मा. महासभेच्या मान्यतेशिवाय त्यांची नियुक्ती नियमित करता येणार नाही. त्यामुळे ह्याची मुळ खात्यास याबाबतची स्पष्ट माहिती देऊन त्याचे आदेश दुरुस्ती करुन नवीन आदेश निर्गमित करावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४० चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, मला कल्पना द्या की, आपल्याकडे कुठल्या कुठल्या संस्थेचे कर्ज आहे?

**शरद बेलवटे :-**

एम.एम.आर.डी.ए., ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्स

**मा. सभापती :-**

मघाशी जो ठराव मांडला तो सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

**अशोक पाटील :-**

ठराव काय होता, तो पुन्हा वाचावा. चर्चा काय होती?

**रिटा शाह :-**

ठरावाचा मेन मुद्दा असा आहे की, कुठल्याही कर्मचाऱ्याबद्दल आमचे दुमत नाही. फक्त ग्रामपंचायत काळापासुन जो कर्मचारी आहे. जोपर्यंत त्यांच्या पदोन्नतीपर्यंत विचार करण्यांत येणार नाही. तोपर्यंत बाकी लोकांची पदोन्नती करायची नाही व त्याबद्दल निर्णय घ्यायचा नाही.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, मा. महासभेने ज्यावेळेला हा ठराव केलेला होता आणि मा. महासभेच्या ठरावानंतरच शासनाचे निर्देश आणलेले आहेत, त्याच्यावर स्थायी समितीला कसे काय अधिकार असेल?

**मा. सभापती :-**

आपण ठराव केला, आपल्याला ज्या पद्धतीने सन्मा. सदस्यांनी पत्र दिले होते. ती पत्र दिली व त्यांच्या ज्या भावना होत्या. त्या त्यांनी ठरावाद्वारे व्यक्त केली आणि त्या ठरावामध्ये नियुक्ती करण्यांत आलेली आहे व एका वर्षाचा प्रवेश काळ दिलेला आहे. एका वर्षाच्या प्रवेशकाळात जर काम समाधानकारक झाले, तर त्यांची पुढची नियुक्ती करावी.

**अशोक पाटील :-**

हा ठराव आपण शासनाकडे पाठवणार आहोत?

**मा. सभापती :-**

हा ठराव प्रशासन आयुक्त ह्यांना दिलेला आहे.

**अशोक पाटील :-**

शासनाने काय निर्देश दिले आहेत? याबाबत मा. महासभेने जो ठराव दिला होता. तुम्हीच तो विषय आणला होता आणि मा. महासभेने बहुमताने तो विषय पास केला होता व त्याच्यावर काही लोकांनी बहिष्कार टाकला होता. तो ठराव जेव्हा शासनाकडे पाठवला, त्याच्यावर शासनाने काय आदेश दिले?

**मा. सभापती :-**

शासनाने त्यांना रुजु करावे असा आदेश दिला होता.

**अशोक पाटील :-**

म्हणजे त्यांना येथे कायम स्वरुपी रुजू करुन घ्यावे.

**मा. सभापती :-**

कायम स्वरुपी रुजु करावे म्हणुन दिले आहे. म्हणुन सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी ठराव मांडला आहे. त्या ठरावामध्ये काय अडचण आहे किंवा काय सुचना हवी आहे, ते आपण सांगावे.

**अशोक पाटील :-**

सुचना अशी आहे की, मला असा खुलासा हवा आहे की, मा. महासभा एखाद्या अधिकाऱ्याचा ठराव करतो आणि मा. महासभा ठराव करुन शासनाकडे पाठविते, शासन त्याच्यावर आदेश देते की, तुम्हीच केलेल्या ठरावानुसार आम्ही त्याला संमती देत आहोत, आपण त्या अधिकाऱ्याला कायम स्वरुपी सामावुन घ्यावे. त्याच्यावर स्थायी समिती परत कसा ठराव करेल? हे तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे का? ह्याचा मला खुलासा हवा आहे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटील ह्याच्यात तो विषयही नाही.

**अशोक पाटील :-**

ह्याचा अजेन्डावर विषय नाही आणि विषय नसताना तुम्ही ठराव कसा करता?

**गजानन भोईर :-**

विषय नाही आणि मागच्या सभेत चर्चा झाली होती की, जो विषय नाही. त्याविषयाचा कुठलाही ठराव मांडता येणार नाही. म्हणुन मागच्या सभेला सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांचा ठराव कॅन्सल करण्यांत आला होता.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

बरोबर आहे. विषयपत्रिकेवर विषय नाही त्याचा ठराव होऊ शकत नाही.

**अशोक पाटील :-**

अजेन्डावर विषय नाही, त्याचा ठराव कसा होऊ शकतो?

**रिटा शाह :-**

सर्व सभेमध्ये मी सांगितलेले आहे, उपायुक्त म्हणुन उद्या ह्या अधिकाऱ्यांमधुन एकाला पद मिळु शकते व आपल्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये म्हणुन हे मान्य करावे असे मी सुचवित आहे.

**गजानन भोईर :-**

ह्याच्यामध्ये मा. महासभेचा अपमान नाही का?

**सुर्यकांत भोईर :-**

किती कर्ज घेतलेले आहे?

**गजानन भोईर :-**

मिरा रोड बॅंकेकडुन रोडकरीता कर्ज वगैरे घेतले आहे का? डेव्हलपमेंट क्रेडीट वगैरे म्हणजे आपली महानगरपालिका फक्त ह्या दोघांची देणेकरी आहे.

**शरद बेलवटे :-**

ओरियन्टल बॅंक ऑफ कॉमर्स ह्यांच्याकडुन रोडकरीता वीस कोटी रुपये कर्ज घेतले आहे आणि एम.एम.आर.डी.ए. कडुन उड्डाणपुलाकरीता कर्ज घेतले आहे आणि पन्नास टक्के पाणी योजनेकरीता

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, एकुण कर्ज किती घेतले आहे?

**शरद बेलवटे :-**

कर्ज सेक्शन आहे ७५ टक्के कोटीचे त्यापैकी ६३ कोटी रिलीझ झाले होते आणि १२ कोटी आर.ओ.बी. चे मिळाले होते आणि रोडसाठी २० कोटी रुपये मिळाले.

**मा. सभापती :-**

आपला जो एम.एम.आर.डी.ए. चा जो रेट आहे तो ११ टक्केचा रेट आहे आणि बँकेतून जे घेतले त्याचा रेट सव्वा सात टक्के आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण ज्या बॅकेमध्ये एफ. डी. ठेवलेले आहे. त्या बँकेमधुन आपण कधी विचारणा केली की, आम्हाला बँकेकडुन लोन देण्यांत यावे.

**मा. सभापती :-**

आपण असे घेतले आहे.

**शरद बेलवटे :-**

ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्समधुन सव्वा सात टक्केनी घेतले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

किती रक्कम घेतली?

**शरद बेलवटे :-**

वीस कोटी रुपये.

**मा. सभापती :-**

आपल्याला जे लोन अकरा टक्क्याने पडते ते आपण रिफन्ड केले व तेथुन जर लोन घेतले तर ते आपल्याला सव्वा सात टक्क्याने होईल आणि तीन ते चार टक्क्यांचा फायदा होईल.

**मिलन पाटील :-**

हे चांगले आहे. आपण ते करुन घ्यावे. आपल्याला व्याज कमी पडते ना!

**शरद बेलवटे :-**

एम.एम.आर.डी.ए. कडुन लोन घेतले आहे. त्याच्यावर व्याजाचा दर अकरा टक्के एवढा आहे. नंतर त्यांना पत्रव्यवहार केला व त्यांना पत्रव्यवहार केल्यावर आर.ओ.बी. ने बारा टक्क्यांचे साडे दहा टक्के केले. मी त्यांना सांगितले की, बँकांनी आम्हाला एवढा दर रिड्युस केलेला आहे तर आपण आमचे दर का रिड्युस करत नाही. साडे दहा टक्केने केले पण जर आपल्याला बँक दरानी देत असतील.

**सुर्यकांत भोईर :-**

एम.एम.आर.डी.ए. तसे मान्य करेल का?

**मा. सभापती :-**

मान्य करेल ना!

**अशोक पाटील :-**

अशी कुठली बँक देते?

**मा. सभापती :-**

ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्सचे लोन सव्वा सात टक्क्याने आहे इतर बँकांकडुन आपण मागवु.

**मिलन पाटील :-**

महानगरपालिकेचा फायदा होईल ते काम करा.

(सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी प्रकरण क्र. ४० चा ठराव सभागृहात मांडला.)

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४० :-**

एम.एम.आर.डी.ए. कडील कर्ज रक्कम एक रकमी परतफेड करण्याबाबत.

**ठराव क्र. ४५ :-**

मनपाने 50mld पाणी योजना, R.O.B. यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज घेतलेले आहे. सदर कर्जाची परतफेड देखील सुरु झालेली आहे. MMRDA कडील कर्जावरील व्याजदर पाहता ते फारच जास्त आहेत. त्यामानाने बँकाचे कर्जावरील व्याजदर कमी झाल्याचे MMRDA ला कळविणेंत आलेले आहे. त्यानुसार MMRDA ने R.O.B. साठी लावलेला १२% व्याजदर हा १०.५०% पर्यंत कमी केलेला आहे.

तसेच 50mld पाणी योजनेचे कर्ज ११% दरानेच ठेवलेले आहे. याकरिता इतर वित्तीय संस्था जर पुढे येवून MMRDA चे कर्ज एक रकमी परत करणार असेल आणि त्यांचे व्याजाचे दर ही MMRDA चे कर्जावरील व्याजदरापेक्षा कमी असल्यास आशा वित्तीय संस्थांना MMRDA कडील एक रकमी कर्जपरतफेड करण्यासाठी आजची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४१ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

जकात अभिकर्ताकडुन पन्नास हफ्ते ७ जुन २००५ रोजी पुर्ण होत आहे. बाकी किती आहेत?

**मा. सभापती :-**

आपल्याकडे जनरल फन्ड कमी आहे, म्हणुन आपण जी एफ.डी. ठेवले आहेत, तर महाराष्ट्र बँकमध्ये ३ कोटी ९० लाखाची एफ.डी. त्याचे व्याज आहे. ५.५० इतके, एस.बी.आय. मध्ये १८ लाख आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, दि. ३१/०३/०६ ला मुदत संपते, ३ लाख ७१ हजार पाचशे नव्वद नवशे पन्नास रुपये. त्याचे व्याज दिलेले आहे. १९,३१,३४० रु. तर हे ३१.३.०६ पुर्वीचे.

**हॅरल बोर्जिस :-**

ती नियत तारीख आहे. ३१.३.०६ पर्यंत मुदत ठेव पुर्ण होईल. त्यावेळी १९ लक्ष ३१ हजार ३४० रुपये मिळेल.

**सुर्यकांत भोईर :-**

१९ लक्ष ३१ हजार ३४० रु. हे व्याज ३१.३.०६ पर्यंतचे आहे की, आताच्या घडीला ह्याच्यातुन कमी होईल.

**हॅरल बोर्जिस :-**

कमी होईल.

**अशोक पाटील :-**

ही मुदत ३१.३.०६ पर्यंत मुदत आहे.

**शरद बेलवटे :-**

ह्याचा जो हफ्ता आलेला आहे, तो आजपर्यंत जनरल फंडातुन भरलेला आहे. तसेच, आर्थिक जनगणनाकरीता कर्मचारी बाहेर असल्यामुळे पाण्याच्या टॅक्सच्या रिकव्हरीवर त्याचा परिणाम झालेला आहे. नविन आकारणी सभागृहाने केलेली आहे. त्याचे ३१ तारखेला आपल्याकडे जमा होणार आहे. परंतु एक हफ्त्यापर्यंत ही रक्कम आपण बाजुला ठेवलेली आहे. परंतु, एक हफ्त्यापर्यंत ही रक्कम आपण बाजुला ठेवलेली आहे. त्याच्यामध्ये तीन डिपोझिटर्स आहेत. त्यामध्ये एक डिपोझिट जे सन २००० ला ठेवले होते, त्याच्यावर जास्तीत जास्त इंटरेस्ट मिळते म्हणुन ती एफ.डी. तोडायची नाही. कारण १ कोटी ३० लाखाचे २ कोटी ६४ लाख रुपये मिळणार आहे. तीन न तोडता ज्या दोन एफ.डी. आहेत, त्या मुदत पुर्व काढल्या तर ३,६८,६७० रुपये आपल्याला लॉस होईल. म्हणुन ह्या दोनच एफ.डी. काढायच्या आहेत आणि उरलेले पैसे जनरल फंडातुन भरावयाचे आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

३१.३.०६ पर्यंत आपल्याला १९ लाख ३१ हजार ३४० रुपये एवढे व्याज मिळेल तर आता जर आपण एफ.डी. तोडल्यानंतर ते व्याज थोडेसे कमी होईल ना!

**शरद बेलवटे :-**

एक टक्का लॉस होणार आहे, तो ३,६८,६७० रु. आणि जी मोठी एफ.डी. आहे, ती तोडायची नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

मुदतपुर्व जर ठेव आपण तोडली तर ३ लाख ६८ हजार ७७० रुपये नुकसान होणार आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

लोनचा हफ्ता किती आहे?

**हॅरल बोर्जिस :-**

मोठ्या रक्कमेचे जे कर्ज आहे ते जर आपण एक रकमी पकडले तर आपल्याला त्यापेक्षा दुप्पटीने त्याचा फायदा होईल.

**मा. सभापती :-**

४ कोटी ३२ लाख रुपये एवढा आपल्याला हफ्ता आहे आणि ह्या दोन एफ.डी. तोडल्यानंतर जनरल फंडातुन आपल्याला १८ ते २० लाख रुपये द्यावे लागतील आणि तो हफ्ता पुर्ण होईल.

**सुर्यकांत भोईर :-**

उरलेले १९ लाख ६८ हजार ६१४ रुपये आपले बॅलेन्स आहे. ते आपल्याला जनरल फंडातुन घ्यायचे आहे. तर एकुण जनरल फंड किती आहे?

**शरद बेलवटे :-**

१ कोटी रुपये आहेत. त्यात ३० तारखेला पगार आलेला आहे व ३० तारखेपर्यंत पाण्याचे भरायचे आहे आणि ३० तारखेपर्यंत ७८ लाख रुपये इलेक्ट्रीकसिटीचे बिल भरायचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, आपण पाणी लोकांना पुरवतो व त्यासाठी जे कर्ज घेतलेले आहे. तर पाणी खात्यातुन आपल्याला किती उत्पन्न अपेक्षित आहे. म्हणजे किती उत्पन्न आहे.

**मा. सभापती :-**

जनरली जे पाण्याचे केले आहे, त्यात आपल्याला इनकम सोर्स नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

इनकम सोर्स नाही तर, ह्याचा फंड किती येतो व आपण ते किती भरले आहे?

**मा. सभापती :-**

त्यामध्ये २० टक्के गळती आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

अत्यावश्यक सेवा म्हणुन गणली जाते. प्रॉफीट ओरियन्टल.

**मा. सभापती :-**

प्रॉफीटचा संबंध ह्याच्यामध्ये येत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

माझा प्रश्न असा आहे, फन्ड जमा किती होतो आणि आपण तीच रक्कम परत लोन म्हणुन

**शरद बेलवटे :-**

लोनसाठी होत नाही. फक्त जे कलेक्शन होईल त्याच्यातुन पाण्याचे बिल पेमेन्ट करु शकातो.

**सुर्यकांत भोईर :-**

माझा तोच प्रश्न आहे, आपण जनरल फंडातुन किती रक्कम देतो. समजा, एक रुपया पाणी खाते देते तर दिड रुपया आपल्याला भरावा लागतो, तर जनरल फंडातुन पन्नास पैसे आपण भरतो का? माझा बोलण्याचा उद्देश तो आहे.

**मा. सभापती :-**

असे ही भरु शकतो. परंतु, हे जे हफ्ते आहेत, शासनाकडुन लोन घेतले आहे, त्या लोनच आहे आणि जे जनरल पैसे पाण्याच्या पोटी घेतो, खर्च करतो ते आपल्याला नो लॉस, नो प्रॉफीटवर करतोय असा विषय आहे. त्यामुळे आपण जे चालु घेतो ते ह्याच्यावर डिपेन्ड नाही.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, पाणी योजनेचा जो हफ्ता आहे. त्याच्यासाठी आपण ह्या दोन एफ.डी. तोडतोय. कारण महानगरपालिकेच्या फंडामध्ये पैसा जमा नाही. जकातीपोटी किंवा कर आकारणी पोटी वसुली झालेली नाही. म्हणुन आपण ह्या दोन एफ.डी. तोडतोय व हा एम.एम.आर.डी.ए. चा हफ्ता भरल्यानंतर पुन्हा जो फन्ड जमा होईल जकातीपोटी किंवा कर आकारणी पोटी तिजोरीमध्ये येईल. तो फन्ड पुन्हा त्या एफ.डी. मध्ये ठेवणार का?

**मा. सभापती :-**

तो फन्ड पुन्हा जमा करणार आहोत आणि हा जो फन्ड ठेवला आहे, तो फन्ड तोडतोय, ते हफ्ते भरण्याच्या अपेक्षेने हा फन्ड ठेवला होता अाणि जनरल फन्डमध्ये जसे पैसे जमा होणार तसे आपण फन्ड जमा होणार तसे पैसे जमा करणार आहोत.

**अशोक पाटील :-**

जास्त व्याज देणाऱ्या बँकेकडे जमा होतील. अशी कुठली बँक आहे का? एफ.डी. ठेवताना पुन्हा दहा टक्के व्याज देतील. असे आपण एखाद्या खाजगी संस्थांना द्या, ते ही तयार आहेत.

**शरद बेलवटे :-**

खाजगी संस्थेला असे देत नाही.

**अशोक पाटील :-**

खाजगी संस्था तुम्हाला सिक्युरीटी द्यायला तयार आहेत.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपण आता जे परत कर्ज घेणार. ओरियन्टल बँकेकडुन ह्याच्यात नक्की तारण काय राहणार. ते आपल्याला कर्ज कशावर देणार?

**मिलन पाटील :-**

ऑक्ट्रायवर.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईरजी आपण कर्ज घेतले कुठे? आणि आपल्याला कर्जाची आवश्यकता कुठे भासली? जेव्हा कर्ज घेऊ तेव्हा हा प्रश्न उपस्थित होणार आहे तेव्हा त्याच्यावर विचार करु.

**गजानन भोईर :-**

आपण चर्चा करतोय ना!

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, डी.पी. रोडसाठी कर्ज घेणार आहोत ना! खांबित साहेब, जे डी.पी. रोड अकरा तयार करायचे आहेत, त्याच्यासाठी कर्ज घेणार आहोत ना!

**गजानन भोईर :-**

अंडरग्राऊंड गटार आहेत.

**मा. सभापती :-**

जेव्हा आपल्याला शासनाची परवानगी येईल. शासन आपल्याला मंजुरी कशी देते, आपण एवढे कॅपेबल आहोत, आपल्याकडे येणारा जो रेव्हेन्यु टॅक्स आहे, ऑक्ट्रायचा टॅक्स येतो, विविध अनुदान आहेत. त्याच्यावर अपेक्षित ठेवुन, शासन आपल्याला कर्ज देण्याची एन.ओ.सी. देईल. त्याच्यानंतर आपल्याला कर्ज मिळणार आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

सभापती महोदय, येथे एफ.डी. तोडायचा प्रश्न फक्त एवढाच आहे, टॅक्सची बिल वेळेवर पोहचणार नाही व जकातीपोटी दोन हफ्ते आहेत. जर ३०.६.०५ पर्यंत वेळेवर जर हा हफ्ता भरला नाही तर १२ टक्क्यावर २ टक्के अजुन ॲडीशनल व्याज आकारले जाईल.

**गजानन भोईर :-**

हाऊस टॅक्सची आतापासुन डिमान्ड का करत नाही?

**हॅरल बोर्जिस :-**

मागणी चालू आहे.

**गजानन भोईर :-**

अजुन एकही डिमान्ड बिल गेलेले नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

बिल अजुन निघाले नाही, पण त्याची प्रोसेस सुरु आहे.

**गजानन भोईर :-**

आता पासुन सुरुवात करा. मग रात्रंदिवस काम करतात ना, वसुली बरोबर नाही. आहे तो पैसा बरोबर घ्या ना!

**मा. सभापती :-**

सदर कामाचा रेव्हेन्यु घेण्यासाठी आपण पुन्हा चर्चेला विषय आणु, जी वसुली आहे ती वसुली व्हायला पाहिजे आणि आपले सर्व कर्मचारी सध्या आर्थिक जनगणनेमध्ये आहेत. त्याच्यामुळे बिल द्यायला विलंब झालेला आहे.

**गजानन भोईर :-**

म्हणजे आता आपल्याला कर्ज घ्यायचे नाही.

**मा. सभापती :-**

जेव्हा कर्जासाठी डिमान्ड कराल तेव्हा तुमच्यासमोर प्रश्न येईल ना!

**गजानन भोईर :-**

हे कर्ज भरण्यासाठीच धांदल चालली आहे. आपण आता एफ.डी. तोडुन कर्ज भरतोय ना!

**मा. सभापती :-**

ही जी एफ.डी. तोडली आहे, ती त्याच्यासाठीच राखीव ठेवली होती. दुसरी कुठली एफ.डी. आपण तोडत नाही.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे दुसरीकडे पैसे नाही का, आपल्याकडे आता ऑक्ट्रायचे पैसे आले. ज्याचा पैसा आहे तो तिथेच वापरला पाहिजे असे काही आहे का? आजपर्यंत कुठले पैसे कुठल्याही रस्त्याला निघुन गेले आहेत.

**शरद बेलवटे :-**

३० तारखेपर्यंत जर हा हफ्ता गेला नाही व जर ३ लाखाचे आज नुकसान होत असेल तर ६ लाखाचे नुकसान भरावे लागणार आहे.

**गजानन भोईर :-**

पुढच्या विषयात विचारतो, हे नुकसान कसे? ठिक आहे, हेच उत्तर पाहिजे होते. म्हणजे ३० तारखेपर्यंत हफ्ता भरायला पाहिजे.

(सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ४१ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी ठराव होण्याअगोदर आम्हाला प्रश्न विचारु दे, की हा जो प्रकरण क्र. ४१ चा ठराव मांडता, ह्याच्यावर आपण किती कर्ज घेतले होते आणि मागचे काही हफ्ते देणे बाकी आहे का?

**हॅरल बोर्जिस :-**

सगळे हफ्ते बरोबर वेळच्या वेळी भरले होते.

**गजानन भोईर :-**

म्हणजे जुना हफ्ता एकही बाकी नाही.

**मा. सभापती :-**

संपुर्ण महाराष्ट्रामध्ये ही पहिली महानगरपालिका आहे की, ज्याच्यावर कुणाच्या थकबाकीचा शेरा नाही आणि आपण रेग्युलर कर्ज परतफेड करत आहोत.

(सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ४१ चा ठराव सभागृहात मांडला.)

**केशव घरत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

माझा असा प्रश्न आहे की, प्रकरण क्र. ४१ मध्ये असा प्रश्न आला आहे की, मालमत्ता कराचे बिल जुन अखेरपर्यंत करदात्यांना मिळणार नसेल, १५ मे पर्यंत बिल जायला पाहिजे. पण अजुनपर्यंत बिल का गेली नाहीत? ह्याला कारण काय आहे? आपण तळमजल्यावर विनाकारण खर्च केला आहे का?

**हॅरल बोर्जिस :-**

कर्मचाऱ्यांचा तांत्रिक प्रॉब्लेम होता. त्यामुळे ही बिल उशिरा झाली आहेत.

**गजानन भोईर :-**

सी.एफ.सी. ला आपण करोडो रुपये खर्च केले आहेत. तो आपण कशासाठी खर्च केला आहे?

**हॅरल बोर्जिस :-**

ही वस्तुस्थिती आहे हे मी देखील मान्य करतो ना!

**गजानन भोईर :-**

बिल जायला नको का?

**हॅरल बोर्जिस :-**

बिल न जाण्याचे तांत्रिक कारणे आहे.

**मा. सभापती :-**

आपले जे कर्मचारी आहेत ते सध्या आर्थिक गणनेकरीता बाहेर आहेत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

साहेब, बिल आमच्याकडे आलेले नाही. आर्थिक गणनेचा प्रश्न येत नाही. कर्मचारी नाही म्हणुन असे नाही तर आमच्याकडे बिल आलेले नाही.

**गजानन भोईर :-**

ह्याला कारणीभुत कोण आहे? बिल तूमच्याकडे न येण्याकरीता, त्याला कारणीभुत कोण आहे?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ठिक आहे, सध्या हा विषय आपल्यासमोर नाही.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेब, आपण बोललात की बिल आमच्याकडे आलेली नाहीत, तर आपण उत्तर द्यायला पाहिजे की, प्रशासनाकडुन बिल का आली नाहीत?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

संगणक विभाग बिल स्वतंत्ररित्या तयार करतात, त्याची प्रक्रिया चालु आहे ती प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याची छपाई होईल आणि संगणकद्वारे ती प्रिटिंग झाल्यानंतर जे बिल वाटप करण्याचा प्रोग्रॅम आहे तो तयार आहे. त्यामुळे बिल तात्काळ वाटण्याची व्यवस्था करण्यांत येईल. ह्या सर्व बाबींच्या मागच्या अमेंडमेन्ट्स व ज्यांची थकबाकी राहिली आहे त्याचा सर्व आढावा घेऊन त्याची बिल तयार होतील. तेव्हा तात्काळ वाटली जातात आणि त्याची वसुली तात्काळ सुरु केली जाईल.

**अशोक पाटील :-**

उपायुक्त साहेब, संगणक विभागाचे जे विशेष कार्यकारी प्रमुख अधिकारी होते. ते सोडुन गेलेले आहेत, तर त्यांच्या जागी आता कोण कार्यभार सांभाळतो.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

संगणक विभागाचे जे अधिकारी सोडुन गेलेले आहेत, त्याच्या बद्दलची वेगळी यंत्रणा आपण उभी केलेली आहे आणि वेगळ्या यंत्रणेच्या मार्फत ते कामकाज चालु आहे, कामकाज कुठेही बंद पडलेले नाही.

**अशोक पाटील :-**

विलंब का लागला? आपण सांगता की, सगळी यंत्रणा सज्ज आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मागच्यावेळी बिल डिसेंबर महिन्यात गेली होती आणि आता जुन महिना चालू आहे.

**अशोक पाटील :-**

म्हणजे विलंब झालेला नाही.

**गजानन भोईर :-**

मागच्यावेळी एका माणसाला तीन-तीन बिल गेलेली होती, ह्यांत यंदा सुधारणा व्हायला पाहिजे.

**हॅरल बोर्जिस :-**

उपायुक्त साहेब, येथे प्रश्न असा आहे की, सन्मा. सदस्यांची अशी भावना झालेली आहे की, ही जर बिल वेळेत निघाली असती तर आज जे ३ लाख ६८ हजार रुपयाच्या आर्थिक नुकसानीला आपल्याला सामोरे जावे लागत आहे, असा मुद्दा आहे. जर ही बिल उशिरा निघण्याबद्दल बोलतात, जरी कर्मचारी बाहेर असले तरी आम्ही आमची कामे वेळेत करु. परंतु, त्या पद्धतीचे काम सी.एफ.सी. मध्ये घडलेले नाही. अजुनपर्यंत नागरिकांना जर बिलं पोहचली नसतील तर लोक कशा पद्धतीचे तुम्हाला भरणा करणार?

**गजानन भोईर :-**

नागरिक बोलतात की, आम्ही पैसे भरायला तयार आहोत.

**हॅरल बोर्जिस :-**

तळमजल्यावर जे नागरी सुविधा केंद्र स्थापन केलेले आहे. तर त्याचे नेमके कामकाज कोण हाताळतो, श्री. माशाळकर जरी येथुन गेलेले असले तरी सुद्धा आजच्या घटकेला त्याचा कार्यभार कोणत्या अधिका-याकडे आहे?

**कैलासबेन जानी :-**

साहेब, आपण करोडो रुपये खर्च करुन ही यंत्रणा तयार केलेली आहे. परंतु, लोकांना वेळेवर बिल जात नाही. ही महानगरपालिकेची काय व्यवस्था आहे, ते आपणच बघा आणि ही एवढी मोठी यंत्रणा उभी करुन फायदा काय आहे?

**हॅरल बोर्जिस :-**

सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. श्री. माशाळकर अधिका-यावर जरी ती जबाबदारी असली व ते जरी सोडुन गेलेले आहेत, तर आजच्या घटकेला त्याचा चार्ज कोणाकडे आहे? नागरी सुविधाचा ताबा आणि त्याचे नियोजन कोणाकडे आहे?

**कैलासबेन जानी :-**

प्रशासनाने उत्तर द्यावे की, ही जबाबदारी कोणाकडे दिलेली आहे?

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्यांची जी मनातील कुजबुज आहे, ती मी समजु शकते. उपायुक्त साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिकेने एक अद्यावत संगणक विभाग सुरु केला आणि आम्ही तो मिरवला व प्रत्येक

वेळेला काहीतरी नविन करतो म्हणुन त्याचे श्रेय आम्ही प्रशासन व आम्ही घेतो. आपल्याकडे श्री. माशाळकर म्हणुन विशेष कार्यकारी अधिकारी नेमले होते आणि ते गेल्यानंतर आम्हाला प्रशासनाकडुन उत्तर मिळाले नाही की, तिथे कोणाला चार्ज दिला आहे, कोण कामकाज सांभाळतो हे अजुन समजले नाही. परंतु, श्री. माशाळकर गेल्यानंतर तो संगणक विभाग बंद पडता कामा नये व बंद झाला किंवा बंद होणारही नाही. बंद नाही आहे. पण आपण जो विलंब दर्शविला तो विलंब होता कामा नये. त्याठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी संपुर्ण देशामध्ये, राज्यात किंवा जिल्ह्यात नाही आहे का? असा अधिकारी मागण्याचा प्रयत्न आपण केला का? मला असे बोलायचे आहे की, हा संगणक विभाग चालु केलेला आहे आणि खरोखर त्याला काळं बोट लागेल, असा अतिसुंदर तो संगणक विभाग आहे, त्या संगणक विभागाकरीता अधिकारी ठेवला नाही म्हणुन आपण अधिकारी मागवावा. अशा पद्धतीची माहिती प्रशासनाकडुन आमच्याकडे यावी आणि हा विषय स्थायी समिती समोर घेऊन नविन अधिकारी नियुक्त करावा असे निर्देश मी प्रशासनाला देत आहे. त्याची माहिती त्वरीत आमच्याकडे द्यावी.

**प्रकरण क्र. ४१ :-**

५० एम.एल.डी. पाणी योजना कर्ज परतफेडी बाबत.

**ठराव क्र. ४६ :-**

मनपाची जुन २००५ अखेरची आर्थिक स्थिती पहाता जकात अभिकर्त्यांकडून 50 हप्ते दि. 7 जुन 2005 पर्यंत पूर्ण होत आहेत. पुढील दोन हप्ते मनपास जकातीपोटी टेंडरच्या अटीशर्तीप्रमाणे प्राप्त होणार नाहीत. तसेच मालमत्ता करांची मागणीबीले जुन अखेरपर्यंत करदात्यांना मिळणार नसल्याने 50 mld पाणी योजना कर्ज परतफेड हप्ता दि. 30 जुन 2005 रोजी देय होत असुन, मुदतीत कर्ज परतफेड हप्ता भरला न गेल्यास विलंब दंड आकारला जाईल.

यास्तव 50 mld कर्ज परतफेड निधी मधील मुदत ठेव पाहता सदरच्या मुदत ठेवीवर मिळणाऱ्या व्याजाचा दर हा फारच कमी आहे, तर कर्जावरील व्याजाचा दर हा फारच जास्त आहे. मुदतठेवीवरील गुंतवणुकीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | मुद्दल | व्याज | अेकुण | नियत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1) | A.D.<br>2003-No. 868963<br>Bank of Maharashtra<br>(व्याजदर 5.50%) | 3,71,50,950- | 19,31,340- | 3,90,82,290- | 31/3/2006 |
| 2) | SD/A No. 573565<br>53 SBI<br>(व्याजदर 5%) | 17,19,219- | 87,586- | 18,06,805- | 16/9/2005 |
| 3) | CDS/E No. 342597<br>Bank of Maharashtra<br>(व्याजदर 10.25%) | 1,30,00,000- | 1,34,01,227- | 2,64,01,227- | 15/10/2007 |

वरील पैकी अ.क्रं. १ व २ मुदत पुर्व काढुन मुद्दल+व्याज मिळुन होणारी रक्कम आणि कर्ज परतफेडचा हप्ता रक्कम मुद्दल रु. 1;18,23,840.43 + व्याज रु. 3,10,33,869.52 असे अेकुण रु. 4,28,57,709.95 कर्जाचा हप्ता आहे. कमी पडणारी रक्कम मनपा फंडामधुन भरणा करावी लागेल. परंतु अ.क्रं. ३ मधील गुंतवणुकीवरील व्याजाचे नुकसान होऊ नये म्हणुन मुदतपुर्व काढणे उचित होणार नाही. तरी अ.क्रं. 1 व 2 या मुदत ठेवी मुदतपुर्व काढून कर्जाचा हप्ता भरण्यासाठी उपयोगात आणाव्यात यासाठी आजची सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४२ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, उत्तन पाली येथे ५० मेट्रिक टन खत प्रकल्प उभारण्याकरीता एकुण खर्च किती आहे?

**डॉ. बावस्कर :-**

खत प्रकल्प उभारण्यासाठी एकुण येणारा खर्च १ कोटी ८५ लाख रुपये एवढा आहे आणि हा खत प्रकल्प एका वर्षामध्ये पुर्ण करायचा आहे.

**गजानन भोईर :-**

डॉक्टर साहेब, हा निधी घसारा निधीतुन न वापरता जनरल निधीतुन का खर्च केला?

**शरद बेलवटे :-**

२० टक्के ॲडव्हान्स पेमेन्टकरीता बिल आले होते. लेखासाठी आणि लेखासाठी जी पोझिशन लागते ती तुम्हाला सांगितलेली आहे की, जनरल फंडामध्ये इतकी रक्कम ॲव्हेलेबल नाही.

**मा. सभापती :-**

जनरल फंडात पैसे नसल्याकारणाने मागच्याविषयी चर्चा केली आणि ज्या एफ.डी. आहेत. त्यांच्या राखीव निधीबद्दल आपण बोललो. आता जनरल फंडात पैसे नसल्याकारणाने जे वृक्ष प्राधिकरण खाते आहे.

**गजानन भोईर :-**

त्याचे खाते कुठे आहे? अजुन त्यांचे खाते उघडले नाही.

**मा. सभापती :-**

त्या खात्यावर रक्कम आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

किती रक्कम आहे?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण त्या खात्याची एन.ओ.सी. आणली का? ते त्यांची निधी द्यायला तयार आहे.

**शरद बेलवटे :-**

ह्या निधीबाबत ३१ मार्च, २००५ पर्यंतची पोझिशन सांगतोय. ७१ लाख ८४ हजार ७५२ रुपये इतके आहे आणि ह्या वर्षापासुन वृक्ष प्राधिकरणाचे बजेट सेपरेट झालेले आहे. तर ते खाते सेपरेट करुन, तिथे पैसे जमा करायचे.

**सुर्यकांत भोईर :-**

ही रक्कम तिथे वर्ग केली व जर नंतर वृक्ष प्राधिकरणाकरीता रक्कम लागली तर ती कुठुन आणायची?

**शरद बेलवटे :-**

ही रक्कम वृक्ष प्राधिकरणकरीताच खर्च करायची आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ठिक आहे.

**गजानन भोईर :-**

तुमची त्याला संमती होती का विरोध केला होता?

**शरद बेलवटे :-**

कशासाठी?

**गजानन भोईर :-**

आपण जो खर्च जनरल निधीतुन केला, त्याला संमती होती ना!

**शरद बेलवटे :-**

खर्च अजुन केला नाही. त्याचे बिल पेन्डींग आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

हा खर्च खत प्रकल्पाकरीता करायचा आहे ना!

**शरद बेलवटे :-**

घसारा निधीतुन वापरायचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

पण उल्लेख केलेला आहे ना की, ५० मेट्रीक टन क्षमतेसाठी

**मा. सभापती :-**

घसारा निधीतुन नवीन वाहने खरेदी करायला पाहिजे होती, पण तो निधी खर्च केला नाही, त्यामुळे तो निधी आपल्याकडे उपलब्ध आहे. तो खर्च जनरल फंडातुन केला.

**अशोक पाटील :-**

वाहनांकरीता किती खर्च आला? जो आपण ह्या जनरल निधीतुन खर्च केला.

**शरद बेलवटे :-**

जेवढी नवीन वाहने खरेदी केली, त्यावेळी जनरल फंडातुन पैसे उपलब्ध होते आणि सध्या हा निधी वापरुन जनरल फंडातुन ट्रेड करुन घेऊ.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सदर विषयाला मंजुरी आहे.

(सन्मा. सदस्या श्रीम. अनिता पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ४२ चा ठराव मांडला.)

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४२ :-**

उत्तन पाली येथील जागेवर ५० मेट्रीक टन क्षमतेचा खत प्रकल्प उभारणे यासाठी राखीव निधीतून प्रदान करणेबाबत व वृक्ष निधी खाते उघडून वृक्ष निधीमधील रक्कम सदर खात्यावर जमा करुन घेणेबाबत.

**ठराव क्र. ४७ :-**

घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी लेखाशाखेकडे मे. मार्तंड बायो. इंजिनिअरींग कं. ह्याचे 20% ॲडव्हान्स पेमेंट करण्यासाठी देयक प्राप्त झाले आहे. सदरचे देयक प्रदानासाठी घसारा निधी खाती असलेली रक्कम जनरल फंडावर वर्ग करुन प्रदान करण्यांत यावे. यासाठी घसारा निधी मुदतपुर्व काढुन देयक प्रदान करणेस आजची सभा मंजुरी देत आहे.

तसेच सन २००५-०६ चे वृक्षप्राधिकरण अंदाजपत्रक स्वतंत्र बनविणेंत आलेले आहे. यासाठी 'वृक्षप्राधिकरण' ह्या नावाने बँकेत खाते उघडुन 'वृक्षसंवर्धन निधी' खाती जमा असलेली रक्कम मुदतपुर्व काढून नवीन उघडलेल्या खात्यात वर्ग करुन घ्यावी व ह्यापुढे वृक्षप्राधिकरणाची देयके ह्यातुनच प्रदान करावीत व जमा होणार वृक्षकर वेळच्यावेळी वृक्षप्राधिकरण खाती भरण्यात यावा. यासाठी आजची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. अनिता पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४३ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

ह्याची मुदत केव्हा संपली? स्थानिक नगरसेवकांनी पत्र दिले आहे त्याचे उत्तर का मिळत नाही?

**मा. सभापती :-**

०१/०४/२००५ पर्यंत.

**शिवाजी बारकुंड :-**

३१/०३/०५ पर्यंत मुदत होती.

**गजानन भोईर :-**

मार्च महिन्याची मुदत होती आणि आयुक्त साहेबांनी फक्त त्यांना सभेमध्ये एक महिना वाढवुन दिला होता. मार्च, एप्रिल, मे आणि जुन.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईरजी एप्रिल महिन्याची मुदतवाढ दिली आणि दैनिक नवशक्तीमध्ये मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये सदर निविदा प्रसिद्ध झाल्या. म्हणजे त्यांनी वेळेमध्ये काम केलेले आहे.

**गजानन भोईर :-**

आता तो कन्स्ट्रक्शन करतोय, त्याला अनुभव आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

होय, त्याने काम केलेले आहे.

**गजानन भोईर :-**

त्याच्या कामाचा रिपोर्ट चांगला आहे का? तुम्हाला जो अर्ज प्राप्त झालेला आहे, त्याच्यात वाचा की काय रिपोर्ट आहे. सदर स्थानिक नगरसेवकाने काय तक्रार केलेली आहे? ते त्या अर्जामध्ये दिलेली आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

त्या पत्राची एक कॉपी द्या.

**गजानन भोईर :-**

आहे, त्यांनाच देणार आहे का? गुरुजी कन्स्ट्रक्शन्सवाला करणार आहे का?

**हॅरल बोर्जिस :-**

गुरुजी कन्स्ट्रक्शन्सवाला काम करणार आहे.

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ४३ चा ठराव सभागृहात मांडला.)

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, एक तांत्रिक मुद्दा निर्दशनास आला की, हे दुरुस्ती आणि देखभालीचे टेंडर आहे. ह्याच्यामध्ये माल मटेरियल किंवा कन्स्ट्रक्शनचा काही संबंध येत नाही. मग ह्याच्यात निविदा अबाव्ह स्विकारण्याचा मतलब काय? आपण कुठुन मटेरियल आणत नाही किंवा कुठले काही कन्स्ट्रक्शन करत नाही की, त्याचे भाव वाढण्याचा संभव नाही.

**गजानन भोईर :-**

जसे आहे तसे घ्यायचे आहे. पॅन्ट आणि शर्ट शिवलेले आहे. फक्त कपडे घालायचे आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

इलेक्ट्रिशनची काम असतात आणि वॅटची बारा टक्क्याने वाढ झालेली आहे.

**अशोक पाटील :-**

वॅटच्या देखभालीचा येथे काय संबंध येतो?

**शिवाजी बारकुंड :-**

देखभाल दुरुस्तीमध्ये केलेल्या कामावर बारा टक्के वॅट जातो.

**मिलन पाटील :-**

ठेका झाला ना, त्या ठेक्याला वॅट लागतो.

**अशोक पाटील :-**

ठिक आहे.

**प्रकरण क्र. ४३ :-**

जेसलपार्क मलनिःसारण केंद्र चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे कामाची निविदा मंजूर करणे.

**ठराव क्र. ४८ :-**

दि. ६.५.२००५ रोजीच्या दै. नवशक्ती व दै. सुरज प्रकाश या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील ठेकेदारांच्या निविदा प्राप्त झालेले आहेत. उपरोक्त कामाची अंदाजित रक्कम रु. १३,१६,११५/- इतकी आहे. सदर सुचनेनुसार एकुण तीन ठेकेदारांनी निविदा सादर केलेल्या असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन | २% जास्त दराने |
| २ | मे. ग्रॅविट इंजि. वर्क्स | ४% जास्त दराने |
| ३ | मे. निर्णय कन्स्ट्रक्शन कंपनी | ५% जास्त दराने |

वरील कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन यांचे दर सर्वात कमी आहेत. सबब मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन यांच्या २% जास्त दराच्या निविदेस तसेच या कामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करण्यास मा. स्थायी समिती सभ मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. सभापती**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४४ चे वाचन केले.)

**केशव घरत :-**

सभापती महोदय, अगोदर हा ठराव मा. महासभेत आला होता की, स्वच्छता राखुन पैसे वसुल करायचे. परंतु, घोडबंदर येथे असा अनुभव आला होता की, ते स्वच्छता तर करत नव्हते. तसेच, तिथे पाणी नाही, लाईट नाही. तरी त्याने प्रत्येक झोपडपट्टीतुन वीस वीस रुपये वसुल केलेले आहेत. ज्या कोणाला दिले होते त्याने. आम्ही त्या लोकांना सांगितले की, तुम्ही कोणालाही पैसे द्यायचे नाही. तर त्याने ते बंद केले आणि पळुन गेला मी, खांबित साहेबांना सांगितले होते की, ज्याला ठेका दिला आहे त्याला माझ्या समोर आणा. साहेब, ही चुकीची पद्धत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, ही चुकीची पद्धत आहे. आपण ती अंमलात आणु नका.

**केशव घरत :-**

अगोदर त्या ठेकेदाराला काम करायला सांगा व नंतर त्याला पैसे वसुल करायला सांगा.

**मा. सभापती :-**

पण आता जे आणले ते वेगळे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

काम होत नाही आणि ते फक्त पैसे वसुल करतात आणि जातात. तिथे पाणी नसतं, काही व्यवस्था नसते. तिथे कोण जाणार व त्यांना पैसे देणार? साफसफाई बरोबर होत नाही.

**दिपक खांबित :-**

तशी आपण कंडीशन ठेवा.

**सुर्यकांत भोईर :-**

कंडीशन ठेवणार. पण हवी तशी साफसफाई होत नाही. आमच्या प्रभागात मुन्शी कंपाऊन्डमध्ये जाऊन बघा. तिथे साफसफाई होते का?

**दिपक खांबित :-**

बिल देतेवेळी स्थानिक नगरसेवकांचे त्याच्यावर दाखले घेऊ.

**अशोक पाटील :-**

मागच्या वेळी आपण हा जो ठराव केला होता व ठेके दिले होते त्यावेळेचा रिझर्ल्ट काय?

**हॅरल बोर्जिस :-**

पाटील साहेब, त्यावेळेचा अनुभव अत्यंत वाईट होता.

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांना काहीही काम न करता पैसे पाहिजे.

**केशव घरत :-**

मा. महासभेने ठराव केला होता की, तो ठेका रद्द करावा.

**अशोक पाटील :-**

त्यांच्याकडुन काही कार्यवाहीच झालेली नाही.

**दिपक खांबित :-**

म्हणुन ते रद्द करायचे असे मा. महासभेने ठराव केला व परत टेंडर काढले व ते मंजुरीला आणले.

**गजानन भोईर :-**

पाच वर्ष झाली नगरपालिका, तीन वर्ष झाली महानगरपालिका आपण जेव्हा ठेका प्रायव्हेटवाल्याला देतो, तेव्हा ते किती वर्षानी महानगरपालिकेचे किंवा नगरपालिकेचे झाले असते? प्रायव्हेटवाला जेव्हा शौचालय बनवतो, तर तो किती वर्ष वसुली करतो.

**दिपक खांबित :-**

वीस किंवा तीस वर्ष.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, हे जे गांधी नगर आहे, स्टेडियमच्या बाजुला जे शौचालय आहे.

**गजानन भोईर :-**

एका प्रश्नाचे उत्तर अगोदर देऊ दे. जे प्रायव्हेट तत्त्वावर बांधायला देतो, पैसे देऊन. ते किती वर्ष आपण त्यांना वापरायला देतो व त्यानंतर किती वर्षांनी ती प्रॉपर्टी आपल्या महानगरपालिकेची होते?

**दिपक खांबित :-**

ते शौचालय त्यानेच बांधायचे, चालवायचे व तीस वर्षानंतर हॅन्ड ओव्हर करायची.

**गजानन भोईर :-**

खाजगी तत्त्वावर किती शौचालये बांधण्यांत आली?

**दिपक खांबित :-**

एकवीस ते बावीस ठिकाणी शौचालय बांधण्यांत आली.

**गजानन भोईर :-**

एकुण मिरा भाईंदर शहरामध्ये का?

**दिपक खांबित :-**

होय.

**गजानन भोईर :-**

आपण बावीस सांगता आणि लिस्टवर अठरा शौचालये दाखविली आहेत. ते आहेत का, नाही हे मला माहित नाही.

**दिपक खांबित :-**

बावीस ठिकाणी.

**गजानन भोईर :-**

बावीस शौचालय आहेत की, बावीस ठिकाणी आहेत.

**केशव घरत :-**

सुलभ शौचालय आहेत.

**दिपक खांबित :-**

बावीस ठिकाणी सुलभ शौचालय आहेत.

**मिलन पाटील :-**

स्टेडियमच्या बाजुला जे शौचालय आहे, तिथे वीस वीस रुपये वसुल करतात. त्याचे ना घेण-ना देणं आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आता जे टेंडर घेतील ते नवीन बांधतील का आहेत ते रिपेअर करतील.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये असलेले मिरा भाईंदर मालकीचे जे शौचालय आहेत, त्या मालकीच्या शौचालयाकरीता त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता आपण हा प्रस्ताव ह्या ठिकाणी आणलेला आहे. त्यांची टेंडर काढलेले आहे. पण त्याच्यामध्ये असे आहे की, काही ठिकाणी त्याची दुरुस्ती करायची आहे. ही दुरुस्ती झाली असे आपल्याला कधी कळेल? आपण ठेकेदारांना जे दिले आहे, त्याची दुरुस्ती करायची आहे. ही दुरुस्ती पुर्ण झाल्यानंतर आपण ॲग्रीमेंट करणार आहोत की, दुरुस्तीच्या अगोदर करणार आहोत.

**दिपक खांबित :-**

ॲग्रीमेंट करुन त्याला आपण टाईम लिमिट दिले आहे की, त्याने किती दिवसामध्ये दुरुस्त करुन द्यायचे आहे.

**मा. सभापती :-**

त्याचा अंदाजे टाईम लिमिट किती आहे?

**दिपक खांबित :-**

एक महिना एका महिन्यामध्ये त्याने दुरुस्ती करायची आहे.

**मा. सभापती :-**

एका महिन्यामध्ये दुरुस्ती झाल्यानंतर त्याचा फेर आढावा ह्या स्थायी समितीसमोर आणायचा आहे.

**केशव घरत :-**

साहेब, पहिल्यांदा त्याची पाणी, लाईट व दुरुस्ती झाली पाहिजे आणि नंतरच ते शौचालय द्या.

**मिलन पाटील :-**

दुरुस्ती झाल्यानंतर स्थानिक नगरसेवकांचा त्याच्यावर दाखला पाहिजे.

**केशव घरत :-**

त्यानंतर ते शौचालय चालु करण्यांत यावे. वसुली करावी.

**सुर्यकांत भोईर :-**

जिथे आदिवासी वस्ती आहे तिथे काय?

**मा. सभापती :-**

ती त्यांची जबाबदारी आहे, ते पैसे भरतील. त्या लोकांनी पैसे द्यावे की नाही द्यावे. तो त्यांचा प्रश्न आहे. त्या ठेकेदाराने महानगरपालिकेला पैसे द्यावे.

**अनंत पाटील :-**

गेल्या वेळेला आमच्या गावामध्ये वसुलीकरीता बरीच भानगडी व मारामाऱ्या झाल्या. कोण वसुली करणार आणि त्याला जबाबदार कोण?

**सुर्यकांत भोईर :-**

जिथे आदिवासी वस्ती असेल तिथे काय?

**मा. सभापती :-**

महानगरपालिका यापुढे वसुलीच्या भानगडीत पडायचे नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेने मिरा भाईंदर ते शहर कचरामुक्त केले की नाही केले? एकतरी कचराकुंडी आहे का? ह्याच्यापुढे लॅटरिंग बॉक्स हा मिरा भाईंदरचा विषय नसेल आणि तो विषय ठेवु सुद्धा नका. लॅटरिंग बॉक्सचा विषय नसेल, देखभाल दुरुस्ती करा व त्यांनीच बांधा, त्यांनी वापरा, त्यांनी सगळं करा. हे त्यांच्यावरच असणार आहे आणि त्यांनी नागरिकांना किती कनव्हेन्स करायचे आणि नगरसेवकांनी किती को-ऑपरेट करायचे ते आपण ठरवु.

**अनंत पाटील :-**

सभापती साहेब, नाईक साहेब असताना आपण असेच शौचालय बांधा आणि वापरा तत्त्वावर दिलेले होते. पण त्यचा काहीही परिणाम शहरावर झाला नाही.

**मा. सभापती :-**

का होणार नाही? त्याचा चांगला परिणाम होईल.

**दिपक खांबित :-**

नगरसेवकांनी सहकार्य केले तर नक्कीच चांगले काम होईल.

**मिलन पाटील :-**

प्रकरण क्र. ४४ चा ठराव मांडला. स्थानिक नगरसेवकांचा दाखला असल्याशिवाय आणि दुरुस्ती एक महिन्यामध्ये पुर्ण केल्यानंतर स्थानिक नगरसेवकांचा दाखला आणावा की, हे काम पुर्ण झालेले आहे. नंतर पुन्हा स्थायी समितीसमोर विषय यावा.

**अनिता पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४४ :-**

आरोग्य विभागाचे सार्वजनिक शौचालये पैसे द्या व वापरा तत्वावर चालविणे कामाच्या निविदांना मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ४९ :-**

मा. महासभेने महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालये पैसे द्या व वापरा तत्वावर चालविणे करीता ठराव क्र. ६५ दि. २०/०१/२००५ रोजी केला आहे. त्यानुसार महापालिकेने स्वतः बांधलेल्या शौचालयाच्या देखभाल व दुरुस्ती कामी रु. २०/- प्रती कुटुंब मासिक वापरास नागरीकांकडून आकारुन खाजगी संस्थाना चालविणेस देणे, खाजगी संस्थाकडून पाण्याची टाकी बसवून पाणी पुरवठा करणे, लाईट कनेक्शन देणे, दैनंदिन शौचालय सफाई करणे कामाचा ठराव पारीत केला होता. आरोग्य विभागाने महापालिका क्षेत्राचे पैसे द्या व वापरा या तत्वावर शौचालय चालविणे कामा करीता महापालिका क्षेत्राची चार गटात विभागणी केली आहे.

महापालिकेने सार्वजनिक शौचालये पैसे द्या व वापरा या तत्वावर चाल विणे कामाची जाहिर निविदा मागवण्यात आल्या होत्या त्यास प्रतिसाद मिळून खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**गट क्र. १ करिता**

| निविदाकाराचे नाव | राजश्री एन्टरप्रायजेस | मे. निर्मल फाउंडेशन | एकता सामाजिक प्रतिष्ठाण | मुंबई स्वच्छकार सेवा मंडळ |
|---|---|---|---|---|
| सिटची संख्या | १९९ | १९९ | १९९ | १९९ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय दुरुस्ती निविदाकार किती कालावधीत करणार आहेत. | २५ दिवसात | १ वर्षाच्या आत | १५ दिवसात | १ महिन्याचे आत |

| निविदाकाराचे नाव | राजश्री एन्टरप्रायजेस | मे. निर्मल फाउंडेशन | एकता सामाजिक प्रतिष्ठाण | मुंबई स्वच्छकार सेवा मंडळ |
|---|---|---|---|---|
| सार्वजनिक शौचालय करीता नागरीकांकडून घेण्यात येणारी रक्कम | प्रती कुटुंब दर महा रु.२०/- | प्रती घर रु. २०/- | प्रती कुटुंब रु. १५/- | दोन रुपये २० पास |
| निविदाकाराकडून सार्वजनिक शौचालय सफाई करणे कामी लावण्यात येणारे मजूर (संख्या) | ६० मजूर पुर्ण गटात | ५ | ०६ | ३५ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय सफाई करणे कामावर देखरेख करीता ठेवण्यात येणारे पर्यवेक्षक (संख्या) | ८ | १ | २ | ५ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय दैनंदिन साफसफाई करणे कामी वापरणार असलेली दुर्गंधी नाशके व प्रती दिन प्रती लिटर प्रमाण | आवश्यकते नुसार | ३ लिटर प्रती दिवस | ॲसीड १० लिटर, फिनाईल ५ लिटर, निरमा पावडर ६ किलो, मिठ २ गोणी | ॲसीड १० लिटर, फिनाईल १३ लिटर, निरमा पावडर ५ किलो |
| शेरा | | | | |

**गट क्र. २ करीता**

| निविदाधारकाचे नाव | दलीत मानव व सेवाभावी मंडळ | सद्‌भाव सामाजिक सेवा संस्था |
|---|---|---|
| सिटची संख्या | ३३५ | ३३५ |
| निविदाकार सार्वजनक शौचालय दुरुस्ती निविदाकार किती कालावधीत करणार आहेत. | एक महिन्यात | एक महिन्यात |
| सार्वजनिक शौचालय करीता नागरीकंकडून घेण्यात येणारी रक्कम | रु. २/- आणि मासिक पास रु. २०/- | रु. २/- आणि मासिक पास रु. २०/- |
| निविदाकाराकडून सार्वजनिक शौचालय सफाई करणे कामी लावण्यात येणारे मजूर (संख्या) | ३४ | ३५ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय सफाई करणे कामावर देखरेख करीता ठेवण्यात येणारे पर्यवेक्षक (संख्या) | ७ | ६ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय दैनंदिन साफसफाई करणे कामी वापरणार असलेली दुर्गंधी नाशके व प्रती दिन प्रती लिटर प्रमाण | २९ लिटर फिनाईल, २७ लिटर ॲसीड | २८ लिटर फिनाईल, जंतू नाशक, २८ लिटर ॲसीड |

**गट क्र. ३ करीता**

| निविदाधारकाचे नाव | एकता सामाजिक प्रतिष्ठाण | दलीत मानव सेवाभावी संस्था | मे. निर्मल भारत फाउंडेशन |
|---|---|---|---|
| सिटची संख्या | १४३ | १४३ | १४३ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय दुरुस्ती निविदाकार किती कालावधीत करणार आहेत. | ठेका मिळाल्यानंतर १५ दिवसांचे आत | १ महिन्यात | निविदा मंजूर झाल्यापासून २९ दिवसात |
| सार्वजनिक शौचालय करीता नागरीकाकडूंन घेण्यात येणारी रक्कम | प्रती कुटुंब रु. १५/- | रु. २/- आणि मासिक पास रु. २०/- | रु. २०/- प्रती घर प्रती महिना |
| निविदाकाराकडून सार्वजनिक शौचालय सफाई करणे कामी लावण्यात येणारे मजूर (संख्या) | ०४ | २० | ३ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय | ०१ | ०५ | ०६ |

| निविदाधारकाचे नाव | एकता सामाजिक प्रतिष्ठाण | दलीत मानव सेवाभावी संस्था | मे. निर्मल भारत फाउंडेशन |
|---|---|---|---|
| सफाई करणे कामावर देखरेख करीता ठेवण्यात येणारे पर्यवेक्षक (संख्या) | | | |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय दैनंदिन साफसफाई करणे कामी वापरणार असलेली दुर्गंधी नाशके व प्रती दिन प्रती लिटर प्रमाण | ॲसिड ७ लिटर, फिनाईल ३ लिटर, निरमा पावडर ४ किलो, मीठ ११ गोणी | १४ लिटर फिनाईल, १७ लिटर ॲसिड | २० लिटर फिनाईल, २५ लिटर ॲसिड |
| शेरा | | | |

**गट क्र. ४ करीता**

| निविदाकाराचे नाव | सद्भाव सामाजिक सेवा संघ |
|---|---|
| सिटची संख्या | ३५५ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय दुरुस्ती निविदाकार किती कालावधीत करणार आहेत. | १ महिन्यात |
| सार्वजनिक शौचालय करीता नागरीकांकडून घेण्यात येणारी रक्कम | रु. २/- आणि मासिक पास रु. २०/- |
| निविदाकाराकडून सार्वजनिक शौचालय सफाई करणे कामी लावण्यात येणारे मजूर संख्या | ३७ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय सफाई करणे कामावर देखरेख करीता ठेवण्यात येणारे पर्यवेक्षक (संख्या) | ०७ |
| निविदाकार सार्वजनिक शौचालय दैनंदिन साफसफाई करणे कामी वापरणार असलेली दुर्गंधी नाशके व प्रती दिन प्रती लिटर प्रमाण | ३० लिटर फिनाईल, ३२ लिटर ॲसिड |
| शेरा | |

गट क्र. ०१ मध्ये आलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता पाहता.

गट क्र. २ मध्ये आलेल्या निविदांचा वरील तुलनात्मक तक्ता पाहता.

गट क्र. ३ मध्ये आलेल्या निविदांचा वरील तुलनात्मक तक्ता पाहता.

गट क्र. ४ मे. सद्भाव सामाजिक सेवा संस्था यांची एकच निविदा प्राप्त झाली आहे. मे. सद्भाव सामाजिक सेवा संस्था यांची निविदा स्विकारण्यास शिफारस करण्यात येत आहे.

गट क्र. १ ते ४ करीता शिफारस केलेल्या निविदा मंजूर करण्यास मा. स्थायी समितीची मंजुरी देण्यात येत आहे. स्थानिक नगरसेवकांची १ महीन्यात दुरुस्ती कामे करुन दाखले घेण्यात यावेत.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- सौ. अनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४५ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

रस्त्यांना नावे देण्याचा विषय अगोदर आपल्या समोर आला होता. तर ह्या विषयावर आपल्या दालनात विस्तृत चर्चा करुन हा विषय मा. महासभेसमोर शिफारस करु.

**प्रकरण क्र. ४५ :-**

रस्त्यांना नांवे देणेबाबत.

**ठराव क्र. ५० :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४६ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

कशाला माफ करायचे? ते पैसे महानगरपालिकेला भरु दे.

**मा. सभापती :-**

स्काऊट गाईड्स ही देशाची सेवा आहे.

**गजानन भोईर :-**

थोडी सेवा आपणही घेऊ. खारीचा वाटा थोडा उचला ना!

**सुयकांत भोईर :-**

महानगरपालिकेच्या शाळेत स्काऊट गाईड्स शिकवले जाते का?

**मा. सभापती :-**

अभिनव विद्यामंदिरमध्ये शिकवले जाते.

**सुर्यकांत भोईर :-**

मी, महानगरपालिकेच्या शाळेबाबत बोलत आहे.

**मा. सभापती :-**

त्याच्यामध्ये शिकवले जात नाही. हे हायस्कुलला आहे.

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ४६ चा ठराव मांडला.)

**केशव घरत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४६ :-**

स्काउट गाईड्स साहित्यावरील जकात माफ करणेबाबत.

**ठराव क्र. ५१ :-**

महाराष्ट्र राज्य भारत स्काउट आणि गाईड्स यांनी नगरविकास विभागास दि. १७/११/२००४ रोजी पत्र दिले असून त्यामध्ये स्काउट आणि गाईड्स ही चळवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरील जगातील सर्व लोकशाही देशामधून चालणारी चळवळ आहे. या चळवळीमध्ये प्रामुख्याने शील संवर्धन, कौशल्य, आरोग्य व इतरांना सहाय्य या चार तत्वाद्वारे तलान मुलांवर चांगले संस्कार करुन चांगले व चारित्र्यवान नागरीक तयार करण्याचे अत्यंत उपयुक्त असे शिक्षण दिले जाते.

''तयार रहा'' हे व्यापक ध्येय नजरेसमोर ठेवून संध पद्धतीद्वारे राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्म सहिष्णुता, स्त्री पुरुष समानता, श्रम प्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टीकोन, संवेदनशिलता, वक्तशिरपणा नीटनीटकेपणा यासारखी मुल्ये त्यांच्यावर बिंबवली जातात. भारतामध्ये शिक्षण देणारी अशी ही एकमेव संस्था असून सन १९७२/७३ पासून स्काउट गाईड्स विषयाच्या शालेय अभ्यासक्रमात अंतर्भाव करुन या विषयाच्या विकासाचे व वाढीचे कार्य शासनाने या संस्थेकडे सोपविले आहे. भारतात स्काउट गाईड्स संस्थेच्या १/३ संस्था महाराष्ट्रात आहेत. स्काऊट गाईड्स ही संस्था शासनमान्य असून सन १९७२-७३ साली संस्थेला शासनाकडून अंशतः अनुदान देण्यात येत आहे. स्काउट गार्डड हा विषय शाळेत राबविणेसाठी महारष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाने खालील शासकीय निर्णयाद्वारे मंजुरी प्रदान केली आहे.

१) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९८८ (इ. १ ली ते इ. ५ वी) शिक्षण व सेवा योजन विभागाच्या शासन निर्णय क्र. पीटीसी (१०८७/(३५५/८७)) माशि-५ दिनांक ५ मे १९८९ अन्वये मंजुर

२) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९८८ (इ. ६ वी ते इ. ८ वी) शिक्षण व सेवा योजन विभागाच्या शासन निर्णय क्र. पीटीसी (१०८७/(३५५/८७)) माशि-५ दिनांक ५ मे १९८९ अन्वये मंजुर

३) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण अभ्यासक्रम १९८८ (इ. ९ वी ते १० वी) एस. एस. सी. १०९१/(४४०/९१) उमाशी-१ अ दिनांक २२ फेब्रुवारी १९९३ अन्वये मंजुर

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात स्काउट गाईड्सचे (पुस्तके बॅचेस) इत्यादी महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्स ७९ एफ रोड मरीन ड्राईव्ह मुंबई ४०० ०२० (राज्य कार्यालय) येथून पाठविले जाते. त्याकरीता काही नगरपालिका / महानगरपालिका सदर मालावर जकात कर आकारत आहे.

स्काउट गाईड ही शैक्षणिक संस्था असून मुलां मुलींवर संस्कार करण्याचे कार्य करते. तरी चळवळीचे कार्य उद्दीष्ट्ये, धोरण लक्षात घेता पाठविल्या जाणाऱ्या स्काउट गाईड्स साहित्यावरील जकात कर माफ करावा असे महाराष्ट्र राज्य भारत स्काउट गाईड्स संस्थेने शासनाकडे दि. १७/११/२००४ रोजी पत्र देऊन मागणी केलेली आहे उपरोक्त संदर्भात स्काउट गाईड्स साहीत्यावरील मालावर ही सभा संपूर्णपणे जकात माफी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४७ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

आजपर्यंत ही देखभाल दुरुस्ती कोण करत होते?

**शिवाजी बारकुंड :-**

डिपार्टमेंट मार्फत होत होते.

**गजानन भोईर :-**

तसेच चालु द्या ना!

**सुर्यकांत भोईर :-**

आता ठेका पद्धतीने करायचे आहे का?

**गजानन भोईर :-**

जे काम होत आहे ते चांगले आहे आणि ठेकेदारावर भरोसा नाही. नगरपालिका चांगले काम करेल म्हणुन नगरपालिकेनेच हे काम करु दे.

**शिवाजी बारकुंड :-**

चोवीस तास यंत्रणा उपलब्ध होईल व आज जवळजवळ दोनशे किलोमीटर लाईन्स आहे. नगरपालिकेमार्फत एवढं काम होऊ शकणार नाही.

**गजानन भोईर :-**

ठेकेदारावर कोण विश्वास ठेवणार.

**हॅरल बोर्जिस :-**

बाकीच्या सगळ्या गोष्टी ठेकेदारच चालवतात ना!

**गजानन भोईर :-**

त्याच्यावरच ही बोंबाबोंब चालली आहे.

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ४७ चा ठराव मांडला.)

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वितरण व्यवस्थेची वार्षिक देखभाल / दुरुस्ती करणे.

**ठराव क्र. ५२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रतिदिन ८१ दललि पाणी पुरवठा करणेत येत आहे. शहरात जवळ जवळ सर्वच प्रभागामध्ये ९०% जलवाहिन्या टाकणेत आल्या आहेत. सदरच्या जलवाहिन्या टाकणेत आल्या आहेत. सदरच्या जलवाहिन्यांद्वारे नागरीकांना पुर्ण क्षमतेने पाणी पुरवठा करणेत येत आहे. अतिरिक्त ५० दललि पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झालेवर जलवाहिन्यामधील पाण्याचा दाब वाढला आहे. परिणामी जास्तीच्या दाबाने जलवाहिन्या फुटतात, शिस्याचे जोडमधून वारंवार गळती होत असल्याने नागरीकांना अपुरा पाणी पुरवठा होणे, नळ जोडणीद्वारे दुषित पाणी पुरवठा होणे अशा प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. परिणामी एकूण गळतीचे प्रमाणे वाढत आहे. तसेच संपूर्ण वितरण व्यवस्था सुस्थितीत राहून नागरीकांना पाणी पुरवठा करणेसाठी दैनंदिन देखभाल / दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

तसेच शहरामध्ये १०० मीमी ते ६०० मीमी व्यासाच्या बिडाच्या व काही प्रमाणात पोलादी जलवाहिन्या जोडण्यासाठी महानगरपालिकेकडे कोणतीही सक्षम यंत्रणा नाही या उपलब्ध असलेल्या

अपुऱ्या कर्मचाऱ्यांकडून दुरस्तीचे कामही करुन घेता येत नाही. तसेच अचानक जलवाहिनी फुटल्यावर अथवा चोकअप झाल्यावर दुरुस्ती करणेसाठी, वेल्डिंग मशीन, ब्रेकर, गॅस कटर, पंप इत्यादी साहित्याची तातडीने आवश्यकत असते. परंतु अशा वेळी दुरुस्तीचे काम हाती घेण्यासाठी महानगरपालिकेकडे कोणतीही मशीनरी उपलब्ध नसल्यामुळे दुरुस्तीचे काम करता येत नाही. परिणामी जनतेच्या व लोकप्रतिनिधींच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत आहेत. सदर कामी विहीत पद्धतीने कंत्राटदाराची नेमणूक करुन काम हाती घेण्यास बराच अवधी जातो. हे सर्व टाळण्यासाठी, गळतीचे प्रमाणे कमी करण्यासाठी सर्व वितरण व्यवस्था सुस्थितीत चालविणेसाठी वार्षिक पद्धतीने जलवाहिन्यांची देखभाल / दुरुस्ती करणे कामी अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये आवश्यक मशिनरी व कुशल कारागीर यांचा समावेश केला असुन सर्व यंत्रणा २४ तास महानगरपालिकेच्या देखभाल / दुरुस्तीच्या कामासाठी उपयोगी पडणार आहे. करीता रक्कम रु. २३,५७,२४५/- (अंदाजित रक्कम) व रु. २४,४९,८५८/- (एकत्रित रक्कम) चे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून सन ०५-०६ च्या अर्थसंकल्पात **'देखभात / दुरुस्ती व किरकोळ खरेदी'** या शिर्षाखाली रु. २.०० कोटीची तरतूद केली असुन सदर तरतूदीतून वरील खर्च भगविणेस हरकत नाही. वरील काम अत्यावश्यक सेवेतील असुन नागरीकांच्या दैनंदिन पाणी पुरवठ्याशी निगडीत आहे. सुमारे ५० कोटी रकमेची पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सक्षम ठेवणेसाठी व नागरीकांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी वरील कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- सौ. रिटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४८ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ४८ :-**

मा. आयुक्त यांनी शिफारस केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (वाहन विभाग)

**ठराव क्र. ५३ :-**

विषय :- महानगरपालिका वाहनावर ठेका पद्धतीने वाहन चालक पुरवठा करणे.

महानगरपालिका वाहनावर ठेका पद्धतीने वाहन चालक पुरवठा करण्याकामी दै. मुंबई सकाळ या वृत्तपत्रात दि. २०/०३/२००५ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | वीणा ट्रॅव्हल्स | | राज टुर्स अ‍ॅण्ड ट्रॅव्हल्स | | सिताराम ट्रॅव्हल्स | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन | प्रति महिना | प्रति दिन | प्रति महिना | प्रति दिन | प्रति महिना |
| १. | अग्निशमन टॅंकर | १३९.५० | ४,१८५ | १४० | ४,२०१ | १४१ | ४,२१२ |
| २. | अग्निशमन फायर फायटर | १६५.३३ | ४,९६० | १६६ | ४,९८० | १६७ | ४,९९५ |
| ३. | अग्निशमन टाटा मोबाई व्हॅन | १३९.५० | ४,१८५ | १४० | ४,२०१ | १४१ | ४,२१० |
| ४. | आरोग्य विभाग (डंपर) | १३९.५० | ४,१८५ | १४० | ४,२०१ | १४१ | ४,२१० |
| ५. | सा. प्रशासन मारुती ईस्टीम | १३९.५० | ४,१८५ | १४० | ४,२०१ | १४१ | ४,२१२ |
| ६. | जे.सी.बी. मशिन | २१० | ६,५१० | २१९ | ६,५८० | २२१ | ६,६१० |
| ७. | पोकलन मशिन | २१० | ६,५१० | २१९ | ६,५८० | २२१ | ६,६१० |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मे. वीण ट्रॅव्हल्स यांनी सादर केलेल्या निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सदर दराची तुलना बाजारभावाशी केली असता ते वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास व त्या कामी येणारे देयक अदा करण्यास मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजुरी देणे.**

**विषय क्र. २ :- महानगरपालिका वाहने वाहनचालकासह भाडेतत्वावर पुरवठा करणे.**

महानगरपालिकेने दि. २७/०५/२००५ रोजी दै. सागर व दै. वृत्तपत्रास या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदेनुसार वाहने वाहनचालकासह भाडेतत्वावर घेण्याकामी खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | तपशिल | साई सिद्धी ट्रॅव्हल्स | सिताराम ट्रॅव्हल्स | विणा ट्रॅव्हल्स | राज टुर्स एन्ड ट्रॅव्हल्स |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मारुती इस्टीम (ए.सी.) | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) ३५,०००/-<br>२) १४.००/-<br>३) १५००/-<br>४) १४.०० | १) ३३,८५०.००<br>२) १०.१०<br>३) १४००.००<br>४) १०.१० | १) ३४८३३/-<br>२) १४.००/-<br>३) १४६१/-<br>४) १४/- | १) ३४८९०/-<br>२) १४.००/-<br>३) १४८०/-<br>४) १४.२०/- |
| २) | मारुती ओमनी (नॉन ए.सी.) | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) २१२००/-<br>२) ०८.५०/-<br>३) ८६०/-<br>४) ८.५०/- | १) २०,५५०<br>२) ६.६०<br>३) ८३५.००<br>४) ६.६० | १) २१,१५०/-<br>२) ९.००/-<br>३) १७०५/-<br>४) ९.००/- | १) २१५००/-<br>२) ८.६०/-<br>३) १४००/-<br>४) १४.०० |
| ३) | टाटा इंडीगो (ए.सी.) | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) ३३७००/-<br>२) १३.५०/-<br>३) १३९०/-<br>४) १३.५०/- | १) ३२,७००.००<br>२) ९.७५<br>३) १३५०.००<br>४) ९.७५ | १) ३३५२०/-<br>२) १३.५०/-<br>३) १४१७/-<br>४) १३.५०/- | १) ३३६००/-<br>२) १४.८०/-<br>३) १४००/-<br>४) १३.६०/- |
| ४) | टाटा इंडिका (ए.सी.) | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) २३,०००/-<br>२) ९.२०/-<br>३) १२९०/-<br>४) ९.२०/- | १) २२,४४४.००<br>२) ७.५०<br>३) ११००.००<br>४) ७.५० | १) २३,०००/-<br>२) ९.२५/-<br>३) १७६६/-<br>४) ९.२५/- | १) २३,०००/-<br>२) ९.५०/-<br>३) १३००/-<br>४) १०.००/- |
| ५) | टाटा इंडिका (नॉन ए.सी.) | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) १९,१००/-<br>२) ७.८०/-<br>३) ९६०/-<br>४) ७.८०/- | १) १८,५५५.००<br>२) ६.६०<br>३) ९००.००<br>४) ६.६० | १) १९,१५०/-<br>२) ७.७५/-<br>३) १६३८/-<br>४) ७.७५/- | १) २०,०००/-<br>२) ७.८०/-<br>३) १२००/-<br>४) ९.००/- |
| ६) | क्वालीस (नॉन ए.सी.) | १) प्रति महिना (२५०० कि.मी.) | १) २१५४०/- | १) २१,१००.०० | १) २१,७००/- | १) २२,०००/- |

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | तपशिल | साई सिद्धी ट्रॅव्हल्स | सिताराम ट्रॅव्हल्स | विणा ट्रॅव्हल्स | राज टुर्स एन्ड ट्रॅव्हल्स |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | २) ८.७०/-<br>३) ११५०/-<br>४) ८.७०/- | २) ७.००<br>३) १०५०.००<br>४) ७.०० | २) ८.७५/-<br>३) १७२३/-<br>४) ८.७५/- | २) ९.००/-<br>३) १२००/-<br>४) ९.००/- |
| ७) | क्वालीस (ए.सी.) | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) २६,९००/-<br>२) १०.५०/-<br>३) १५५०/-<br>४) १०.५०/- | १) २५,७२५.००<br>२) ८.२५<br>३) १४००.००<br>४) ८.२५ | १) २६,०२५/-<br>२) १०.२५/-<br>३) १८६७.५०/-<br>४) १०.५०/- | १) २७,०००/-<br>२) १०.५०/-<br>३) १६,०००/-<br>४) १०.५०/- |
| ८) | टाटा सुमो / अर्माडा (नॉन ए.सी.) | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) १९,९००/-<br>२) ८.०२/-<br>३) ९८०/-<br>४) ८.०२/- | १) १९,७००.००<br>२) ६.५०<br>३) ९२५.००<br>४) ६.५० | १) १९,८७५/-<br>२) ९.००/-<br>३) १६६२.५०/-<br>४) ९.००/- | १) २०,०००/-<br>२) ८.००/-<br>३) १०००/-<br>४) ८.००/- |
| ९) | ऑटो रिक्षा | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) १७,५००/-<br>२) ---<br>३) ६००/-<br>४) --- | १) १६,५००.००<br>२) ---<br>३) ५६०.००<br>४) --- | १) १७,१५०/-<br>२) ---<br>३) ६७१/-<br>४) --- | १) १७,५००/-<br>२) ---<br>३) ५६०/-<br>४) --- |
| १०) | ऑटो रिक्षा ध्वनीप्रेक्षकासह | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) २८,६००/-<br>२) ---<br>३) ९८०/-<br>४) --- | १) २७,६००.००<br>२) ---<br>३) ९००.००<br>४) --- | १) २८,६७५/-<br>२) ---<br>३) १९५५/-<br>४) --- | १) २९,०००/-<br>२) ---<br>३) १०००/-<br>४) --- |
| ११) | टेम्पो ४०७ | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | १) ४२,२००/-<br>२) ---<br>३) १५८०/-<br>४) --- | १) ३९,६५०.००<br>२) ---<br>३) १४००.००<br>४) --- | १) ४२,१००/-<br>२) ---<br>३) १४०३/-<br>४) --- | १) ४२,५००/-<br>२) ---<br>३) १६००/-<br>४) --- |
| १२) | टेम्पो ४०७ ध्वनीप्रेक्षकासह | १) प्रति महिना (२५०० कि.मी.)<br>२) २५०० कि.मी. | १) ४६,१००/-<br>२) --- | १) ४४,९५०.००<br>२) --- | १) ४६,२००/-<br>२) --- | १) ४७,०००/-<br>२) --- |

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | तपशिल | साई सिद्धी ट्रॅव्हल्स | सिताराम ट्रॅव्हल्स | विणा ट्रॅव्हल्स | राज टुर्स एन्ड ट्रॅव्हल्स |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नंतर प्रति कि.मी.<br>३) प्रति दिवस (८० कि.मी.)<br>४) ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | ३) १८७०/-<br>४) --- | ३) १८००.००<br>४) --- | ३) २५४०/-<br>४) --- | ३) १९००/-<br>४) --- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांचे दर सर्वात कमी असून बाजार भावाशी तुलना केली असता ते वाजवी दर असुन सदरचे दर स्विकारण्यास व त्याकामी वेळोवेळी येणारे देयक अदा करण्यास ही सभा मुंबई अधिनियम १९४९ चे प्रकरण कलम ७ खंड (ड) नुसार वरील प्रकरणी ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०२.०० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**